# चैतन्य लहरी

सप्टेंबर - ऑक्टोबर २००७
अंक क्र. ९/१०



गणेश पूजा, दि. १६ सप्टेंबर २००७











## अनुक्रमणिका


- श्रीगणेश पूजा (वृत्तांत) सीडनी, दिनांक १४ सप्टेंबर २००७ ........ २
- विवाह समारंभ, सीडनी, दिनांक १५ सप्टेंबर २००७ ........ २
- 'श्रीमाताजींची अत्यंत अनपेक्षित व आश्चर्यकारक अशी छोटीशी सहल' मंगळवार, २१ ऑगस्ट २००७ ........ ३
- आपल्या घराकडे श्रीमाताजींचे पुनरागमन' शुक्रवार दिनांक १७ ऑगस्ट २००७ ........ ५
- गणपतीपुळे सेमिनार २००७ वृत्तांत ........ ६
- गोष्टीरूप श्री संपूर्ण दुर्गासप्तशती (देवी माहात्म्य)संक्षिप्त ........ ९
- विवेक,श्रीगणेश पूजा, १९८७ , पुणे ........ १४
- निरागसता,श्री गणेशपूजा, श्रीमाताजींचे भाषण, मास्को, ९९ ........ १७


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट,सी.डी., पुस्तके, मासिके,श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था, "**निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे**" या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, **निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे**. या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करू नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लिडरवर राहील.

तसेच चैतन्य लहरी मासिकाचे सन २००७ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यांसाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल. कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.


NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD.

BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,

KOTHRUD, PUNE 411 038. TEL. 020 25286537

## श्रीगणेश पूजा (वृत्तांत) सीडनी, दिनांक १४ सप्टेंबर २००७

श्रीगणेशपूजा २००७ साठी सीडनीमधील दक्षिण भागामध्ये असणाऱ्या -बालमोरल- देशाच्या भूमीवरील पहिल्या श्रीमाताजींच्या साकार पूजेसाठी आदल्या दिवशीच उशिरा रात्रीपर्यंत जगभराच्या कानाकोपऱ्यातून शेकडो सहजयोगी जमले होते. ही खाजगी मालकीची भूमी सहजयोग्यांसाठी अनेक सुखसोईने सोईने युक्त असून अर्ध्या तासाच्या प्रवासानंतर पोहोचता येते.पूजेच्या निमित्ताने जगभरातून आलेले सर्व सहजयोगी एकमेकांना भेटून विचारपूस करीत होते.विवाहासाठी श्रीगणेशांच्या पवित्र भूमीत श्री गणेश पूजेच्या निमित्ताने आणि प्रत्यक्ष आदिशक्ती श्रीमाताजींनी साकार रूपात जातीने केलेली निवड यामुळे सर्व विवाहात प्रत्यक्ष भाग घेणारे सर्वजण फार आनंदी झाले होते.त्यात आणखी आनंदाची गोष्ट म्हणजे या विवाहांबरोबर श्रीमाताजींचा नातू श्री आनंदभय्या याच्यासाठी वधू श्रीमाताजींनी स्वत: निवडली होती. आणि त्यांचा देखील विवाह सर्वांबरोबर या श्रीगणेशाच्या पवित्र भूमीत होणार असल्याने विशेष आनंद जाणवत होता.

दुसऱ्या दिवशी होणाऱ्या विवाहाच्या तयारीत सर्व कार्यकर्ते लागले होते. संध्याकाळच्या जेवणानंतर सर्वजण दुसऱ्या ठिकाणी होणाऱ्या विविध करमणुकीच्या कार्यक्रमाचा आनंद लुटण्यासाठी त्या सभागृहाकडे गेले. सदर कार्यक्रमात काही नव्याने रचलेली आदिशक्तीची स्तुतीपर गीते फारच चांगली झाली. त्यावेळी काही विदेशी बंधू-भगिनींनी भारतीय नृत्याचे काही प्रकार सादर करून सर्वांची वाहवा मिळविली. त्यामध्ये चीनच्या कलाकारांनी काही नृत्याविष्कार सादर केले. -मिच्छेल अँन्जीचे- शाब्दिक वर्णनही तेथे सादर करण्यात आले. युवाशक्तीने हास्यपूर्ण विनोदी कार्यक्रम तसेच भरपूर नृत्याचे व संगिताचे प्रकार सादर केले. हा कार्यक्रम अगदी पहाटेपर्यंत सुरू होता.

सदर कार्यक्रमाला श्रीमाताजींची कन्या श्रीमती साधनादीदी, श्री रोमेल साहेब, श्री आनंदभय्या व त्याची नववधू उपस्थित होते. त्यावेळी श्रीआनंदभय्याने देखील नृत्य करून सर्वांना आनंदी केले. सदर श्रीमाताजींच्या कुटुंबीयांच्या सहवासामुळे सर्वजण अत्यंत आनंदी झाले होते.त्याचवेळी ठरलेल्या नवीन वधूवरांची नावे व सूचना देण्याचे काम बाजूला सुरु होते. तसेच एकीकडे नवीन वधू-वरांच्या हातावर मेहेंदी काढण्याचे काम सुरू होते. सर्व नववधू आपल्या होणाऱ्या जोडीदारासमक्ष मेहेंदी काढून घेत चैतन्यात आनंदात हसत खेळत होते.

## विवाह समारंभ, सीडनी, दिनांक १५ सप्टेंबर २००७

श्रीमाताजींनी स्वत: जमविलेल्या लग्नांच्या पवित्र दिवसाची सुरवात सकाळी हळदीच्या समारंभाने झाली. त्यावेळी सर्वजण खूप आनंदी होते. हळदीचा कार्यक्रम बालमोरच्या थंड पाण्याच्या तळ्याकाठी साजरा करीत होते. त्यांनतर सर्वांनी दुपारचे जेवण केले. त्यानंतर लग्नाचा पेहराव करून सिडनीला परतले. लग्नापूर्वी सर्व नवरदेवांनी श्रीमाताजींची गणेशपूजा केली. त्यानंतर सर्व नववधूंनी श्रीमाताजींची गौरीस्वरूपात पूजा केली. त्यानंतर प्रत्येकास श्रीमाताजींच्या चरणावर बोलविण्यात आले.

लग्नसमारंभ संध्याकाळी होमपुर नावाच्या ठिकाणी आयोजित केला होता. त्याठिकाणी श्रीमाताजी व श्रीपापाजींची गाडी थेट स्टेजपर्यंत नेण्याची व्यवस्था केली होती.यावेळी श्रीमाताजींचे नातू श्री आनंदभय्या व त्याची ऑस्ट्रेलियन बायको श्रीमती मिरजाम त्याचबरोबर आणखी ४६ जोडप्यांचा विवाह होणार होता. तसेच या लग्नाला श्रीमाताजींची कन्या श्रीमती साधनादीदी व त्यांचे पती श्री रोमेल साहेब उपस्थित होते.प्रथम श्रीमाताजी व श्री पापाजींचे स्वागत करण्यात आले. त्यावेळी त्यांच्या चरणावर हार अर्पण केला.संपूर्ण लग्नसमारंभ अतिशय शिस्तबद्धपणे श्री नलगिरकर यांच्या मार्गदर्शनाने झाला.सर्व सहजयोगातील विधी व्यवस्थितपणे पार पडले. लग्न समारंभानंतर सर्वत्र प्रचंड आनंद व चैतन्य जाणवत होते.या लग्नसमारंभाला विशेष महत्त्व होते कारण या लग्नांमध्ये श्रीमाताजींच्या नातवाचे लग्न होते. गणेशाच्या पवित्र भूमीत, श्रीमाताजींचे चैतन्यमय आशीर्वाद जाणवत होते.

# 'श्रीमाताजींची अत्यंत अनपेक्षित व आश्चर्यकारक अशी छोटीशी सहल'

मंगळवार, २१ ऑगस्ट २००७

आजच्या सकाळीच कबेल्याने आकाश पावसाच्या ढगांनी आच्छादून गेलेले पाहिले. श्रीमाताजी आपल्या शयनकक्षातून बाहेरच्या हॉलमध्ये आल्या आणि श्रीमाताजींनी पूलावरुन फिरून येण्याची आपली इच्छा व्यक्त केली. अचानक रीमझिम असा पावसाचा वर्षाव होण्यास सुरुवात झाली आणि अगदी अनपेक्षितपणे आईने छोट्याशा सफरीला जाण्याचे ठरविले.

आईच्या अशा अनपेक्षितपणे सफरीच्या इच्छेमुळे मात्र इतर सहजयोगी अगदी भांबावून गेले कारण श्रीमाताजींची कार व तो पूल सजविण्याची सर्वांची धावपळ सुरू झाली. या तयारीसाठी फक्त आमच्याकडे दहा मिनीटे होती.

बाजूला श्रीमाताजी आमच्या गोड गोंधळ उडविणाऱ्या धावपळीकडे कौतुकाने पहात होत्या. मजा पहात होत्या. सर सी.पी.सोबत श्रीमाताजी कारमध्ये बसल्या. 'तुम्ही सर्वजण ओले होऊ नका बरें' या शब्दांमध्ये आईने आपल्या मुलांबद्दलची काळजी, जिव्हाळा व्यक्त केला तसेच, 'पहा हे सर्वजण किती आनंदी झालेले आहेत' असेही त्या म्हणाल्या.

आपल्याला कोठे थांबावयाचे आहे याबद्दल कसलीच कल्पना नसताना सर्वजण आईच्या कारपाठोपाठ निघालेले होते. खरोखरीच तो अत्यंत कल्पनारम्य सुंदर असा देखावा होता. त्या देखाव्यामध्ये ढग सावकाशपणे आकाशामधून खाली उतरून पर्वतांवर डोंगरांवर स्थिरावत होते. एखाद्या जादुई दुनियेप्रमाणे हे सर्व भासत होते. 'यासारख्या काही गोष्टी तुम्ही भारतामध्ये पाहू शकणार नाहीं' असे श्री माताजी म्हणाल्या.

त्या डोंगर दऱ्यांमध्ये उगविलेले टवटवीत गवत, डोंगरावरील व सभोवताली उगविलेली ती हिरविगार वनराई या सर्वांमुळे ते ठिकाण एखाद्या स्वर्गाप्रमाणे भासत होते. 'आणखी अशाच विशिष्ठ ठिकाणी जाण्याची तुझी इच्छा आहे का?' असे सर सी.पी.साहेबांनी विचारल्यानंतर 'कोठेच नाही' असे श्रीमाताजी म्हणाल्या. त्यानंतरही सर सी.पी.साहेबांनी आपली ही सफर पुढे अशीच सुरू ठेवली.

श्रीमाताजी पुढे अशाच ईटालीअन निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत घेत निघाल्या.' हे एक नंदनवनच आहे आणि तुम्ही या अशा सुंदर देशामध्ये राहता. खरोखरच परमेश्वराने तुम्हाला अत्यंत आशीर्वादीत केलेले आहे.' अशा शब्दांमध्ये आईने या निसर्गसौंदर्याची स्तुती केली.

साधारण अर्ध्या तासाच्या अशा अनपेक्षित सहलीनंतर आईची कार पुन्हा आपल्या महालाच्या दिशेने निघाली. परतीच्या प्रवासादरम्यान पाऊस थांबलेला होता आणि पावसांच्या ढगाऐवजी आकाशामध्ये छान सूर्य चमकत होता. त्यामुळे या पावसानंतरचे ते सूर्याच्या किरणांनी न्हाऊन निघालेले ते हिरवे डोंगर आणि ते लख्ख आकाश पाहणे तसेच सर्व बारकावे न्याहाळत कारमधून निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेणे श्रीमाताजींचे संपूर्ण परतीच्या प्रवासभर चालूच होते.

महालात परतल्यानंतर श्रीमाताजींनी सर्व युवाशक्तीला बाहेर जाऊन निसर्गसौदर्याचा आस्वाद घेण्यासाठी आणि वळणे वळणे घेत निघालेल्या नदीचे पात्र पाहून येण्यासाठी सांगितले. त्यानंतर त्या म्हणाल्या की, 'इटलीच्या निसर्गसौदर्याची सर भारतामधील काश्मीरला किंवा स्वित्झरलँडलाही येणार नाही' अशा शब्दात येथील निसर्गसौदर्याची स्तुती केली.

ज्या सहजयोग्यांना आईबरोबर या सहलीला जाण्याची सुवर्णसंधी मिळाली ते सर्वजण आता इतर सहजयोग्यांना या आश्चर्यकारक सहलीबद्दल सांगत होते.

त्यावेळी श्रीमाताजींनी त्यांना भेटायला आलेले रोम आणि दक्षिण इटलीमधील काही सहजयोगी पाहिले. एका

जोडप्याने त्यांचे अवघे एक महिन्याचे बाळ श्रीमाताजींच्या दर्शनासाठी आणले होते. त्याच्याकडे पाहून श्रीमाताजी म्हणाल्या की, 'बघा किती गोड आहे तो एखाद्या संतासारखाच तो दिसत आहे. नक्कीच तो एक महान संत होणार आहे.' अशा शब्दांमध्ये आईने त्या मुलाबद्दल भाकित केले. त्या मुलाचे नाव अॅन्जीलो (अॅन्जील) हे नाव होते.

आई थोडावेळ थांबून, 'या मुलाला देवदूत हेच भारतीय नाव अधिक योग्य वाटते असे म्हणाल्या.' तसेच या नावाचा अर्थही समजावून सांगितला की,' देवदूत म्हणजे परमेश्वराचा संदेश वाहून नेहणारा.' त्यावेळी नुकत्याच श्रीमाताजींसोबत सहलीवरून आलेल्या सहजयोग्यांना श्रीमाताजींनी विचारले की, 'हे इथे आलेले सर्वजण कोठून आलेले आहेत.''त्यावेळी सर्वांना इटालीयन भाषा शिकण्याबाबत 'श्रीमाताजी म्हणाल्या त्यानंतर 'आई तूच सर्व भाषांची जननी आहेस.' असे सर्व सहजयोगी एका सुरात म्हणाले.

नंतर आईने त्या सर्वांना जेवण करण्यासाठी घेऊन जाण्यास सांगितले. खोलीमधून बाहेर पडताना ते सर्व सहजयोगी या सहलीच्या आनंददायक अनुभवामुळे आणि आईच्या प्रेमाने अगदी टवटवीत झालेले होते.

– जय श्रीमाताजी.

## निर्मल निर्मल निर्मला

*चाल – विठ्ठल विठ्ठल विठ्ठला*

निर्मल निर्मल निर्मला, आदिशक्ती तू निर्मला
मोक्ष प्रदायनि निर्मला, कुलस्वामिनी निर्मला ।। धृ ।।

चैतन्याची माता आमची, पराशक्ती, निर्मला
सरस्वती लक्ष्मी महाकाली, निर्मला
गणेश गौरी ब्रह्मदेव, लक्ष्मी नारायण निर्मला
निर्मल निर्मल निर्मला ।। १ ।।

आदिगुरु दत्तात्रय जगदंबा निर्मला
श्रीमंत गरीब जनतेला वेड लावले निर्मला
निर्मल निर्मल निर्मला ।। २ ।।

दुर्गामाता सिताराम राधाकृष्ण निर्मला
सहजयोग्यांच्या कल्याणा अवतरी तू निर्मला
निर्मल निर्मल निर्मला ।। ३ ।।

तूच विठ्ठल तुच रुक्मिणी तूच राम निर्मला
जिजस मेरी येशू मेरी भगवान महावीर निर्मला
निर्मल निर्मल निर्मला ।। ४ ।।

कुंडलिनी जागृत करूनी सहस्त्रारी निर्मला
चैतन्याच्या थंड लहरी देशी तू निर्मला
निर्मल निर्मल निर्मला ।।५।।

अवघ्या विश्वाच्या कल्याणा आवतारली तू निर्मला
देशोदेशी जागृती देवूनी योगी तू घडविला
निर्मल निर्मल निर्मला ।।६।।

## 'आपल्या घराकडे श्रीमाताजींचे पुनरागमन'

### शुक्रवार दिनांक १७ ऑगस्ट २००७

साधारण दुपारी १२ वाजून ५४ मिनीटांनी श्रीमाताजींचे विमान मिलान येथील जमिनीवर स्थिरावले. त्यावेळी तेथे काही सहजयोगी आणि युवाशक्ती श्रीमाताजींच्या स्वागतासाठी आणि त्यांना आपल्या घराकडे घेऊन जाण्यासाठी अगदी उत्सुकतेने त्यांची वाट पाहत होते.

जेव्हा आईचे सर सी.पी.बरोबर इटलीच्या भूमीवर पुन्हा आगमन झाले तेव्हा काही सहजयोग्यांनी श्रीमाताजींना पुढे येऊन काही सुंदर फुले देऊन श्रीमाताजींचे स्वागत केले. आईनेही अतिशय आनंदाने सर्व फुलांचा स्वीकार केला.

त्यावेळी येरेशिया आणि बल्वेरीआ मधील बऱ्याच युवाशक्तीला पाहून श्रीमाताजी अत्यंत आनंदीत झाल्या. यापूर्वीही बऱ्याचदा आईने ते किती चांगले आहेत याबद्दल त्यांचे कौतुक केलेले होते.

'पॅलाझो-डोरीमा' येथे श्रीमाताजींची कार पोहचताच दोन्ही बाजूंनी सहजयोगी फुलांनी सजविलेल्या वाटेवर उभे राहून आपल्या आईच्या स्वागतासाठी सज्ज झालेले होते. श्रीमाताजींनी वाटेत दहा मिनिटे एका हॉटेलमध्ये थांबून लहान मुलांनी देऊ केलेल्या फुलांचा स्वीकार केला. यादरम्यान श्रीमाताजींनी या छोट्यांची नावे आणि ते कोठून आलेले आहेत याची विचारपूस त्यांनी केली.

आईचे आपल्या इटलीमधील महालामध्ये पुन्हा आगमन होताच त्यानीं लहान मुलांना व युवाशक्तींना बोलावले त्यांनी एकत्र जमल्यानंतर गणेशा गणेशा हे भजन म्हणावयास सुरुवात केल्यानंतर श्रीमाताजींनी सर्वांना पेय देण्यास सांगितले. तेथे उपस्थित असणाऱ्या मुलांपैकी तीन नवजात बालकांनी आईचे लक्ष वेधून घेतले. आईने त्यांची नावे ऐकून 'या छोट्या मुलांची नावे खरोखरच खूप गोड आहेत असे म्हणून कौतुक केले.'नंतर आईच्या इच्छेनुसार मुलांना सरबत वाटण्यात आले.

श्रीमाताजी एका ऑस्ट्रेलियामधील युवाशक्ती मुलाकडे बोट दाखवून,'हा मुलगा तबला खूप छान वाजवतो' असे म्हणाल्या. त्यानंतर आम्ही सर्वांनी 'नमामी श्री गणराज दयाळा' हे श्रीगणेशांचे भजन म्हणण्यास सुरुवात केल्यानंतर आईने या भजनाचा आनंद अगदी जवळून सर्वांना निरखत घेतला. भजन संपल्यानंतर, 'सर्व लहान मुले दूत आहेत महान गायक आहेत कारण त्यांना ताल, सूर,लय याचे खूप चांगले ज्ञान असल्याने ते भजन कसे म्हणायचे हे त्यांना माहीत आहे' असे कौतुक श्रीमाताजींनी केले. 'ही सर्व मुले माझी मुले आहेत ही खरोखरीच सन्माननीय किंवा अभिमानास्पद अशी गोष्ट आहे 'असेही श्रीमाताजी म्हणाल्या.

आम्ही सर्वांनी श्रीमाताजींना वंदन केले आणि पूर्ण आशिर्वादीत होऊन आम्ही त्या खोलीमधून बाहेर पडलो. त्यानंतरही आईनी सर सी.पीं.सोबत या गोड मुलांबद्दल आपले बोलणे सुरू ठेवले आणि 'कोणालाच कुठेही अशी शहाणी मुले सापडणार नाहीत असे श्रीमाताजी म्हणाल्या. त्यानंतर सर .सी.पी.म्हणाले 'हे सर्व केवळ तुझ्या व सहजयोगामुळेच शक्य आहे. त्यानंतर सर्वांनी श्रीमाताजींना नमस्कार करून आशीर्वाद घेतला.

● ● ●



# गणपतीपुळे सेमिनार २००७ वृत्तांत

गणपतीपुळे सेमिनार २००७ दिनांक १२,१३ व १४ ऑक्टोबर आयोजित केले होते. सदर सेमिनारसाठी महाराष्ट्रातील सर्व भागातून तसेच गोवा, गुजराथ, राजस्थान, दिल्ली, हैद्राबाद, कलकत्ता, तसेच इतर राज्यातून अनेक सहजयोगी आले होते. कार्यक्रमासाठी अनेक कार्यकर्ते अगोदर साधारण एक महिन्यापासूनच गणपतीपुळे सेमिनारच्या ठिकाणी तयारीसाठी गेले होते. आपल्या जागेची स्वच्छता, मुख्य स्टेज सजविणे, बसण्याची व्यवस्था करणे, पाणी व टॉयलेटची व्यवस्था करणे, जेवणाचा पेंडॉल तयार करणे, मुख्य गेट तयार करणे सगळीकडे लायटिंगची कामे पूर्ण करणे, मिनरल पाण्याची व्यवस्था, चहा/कॉफीची व्यवस्था, निर्मल ट्रान्सफॉरमेशनतर्फे सर्व ऑडिओ/व्हीडीओ कॅसेट ,सिडी, फोटो, पुस्तके सहज साहित्य मिळण्याची केलेली व्यवस्था ही सर्व निर्मलनगरीची झालेली तयारी पाहून सर्वांना श्रीमाताजींच्या साकाररूपातील गणपतीपुळे सेमिनारची आठवण झाली.

**१२, ऑक्टोबर २००७**

आज सेमिनारची सुरवात संध्याकाळी ४.०० वाजता तीन महामंत्रांनी झाली. स्टेजची सजावट गुजराथ, राजस्थानच्या सहजयोग्यांनी केल्याचे स्टेजकडे पाहिल्याबरोबर जाणवत होते.त्यानंतर सेमिनारला उपस्थित राहिलेल्या सर्वांचे श्री राजेश गुप्ता यांनी स्वागत करून सर्वांना निर्मलनगरी स्वच्छ ठेवण्याबाबत सांगितले. त्यानंतर स्टेजवर लावलेल्या स्क्रिनवर मूलाधार चक्राचे नाव व देवता दाखविली. मुलाधार चक्राची माहिती सांगण्यासाठी श्री कपिल कुमार यांना स्टेजवर बोलविण्यात आले. त्यांनी मूलाधार चक्राची माहिती सांगताना श्रीमाताजींनी वेळोवेळी मूलाधार चक्राबाबत सांगितलेली माहिती सांगितली. त्यानंतर मूलाधार चक्राचे, जय गणेश जय गणेश जय गणेश देवा हे भजन झाले. त्यानंतर मूलाधार चक्राबाबतची श्रीमाताजींची अमृतवाणी दाखविली. शेवटी मूलाधार चक्राचा राग लागून सर्वांनी ध्यान केले.

त्यानंतर स्वाधिष्ठान चक्राची माहिती सांगण्यासाठी श्री सिद्धार्थ गुप्ता यांना स्टेजवर बोलविण्यात आले. त्यांनी स्वाधिष्ठान चक्राची माहिती सांगत असताना श्रीमाताजींनी पूर्वी स्वाधिष्ठान चक्राबाबत सांगितलेली माहिती सांगितली. त्यानंतर जय शारदे वागेश्वरी हे भजन झाले. त्यानंतर श्रीमाताजींची स्वाधिष्ठान चक्राबाबतची अमृतवाणी सर्वांनी ऐकली. त्यानंतर स्वाधिष्ठान चक्राच्या रागाच्या कॅसेटवर सर्वांनी ध्यान केले.

त्यानंतर नाभी व भवसागर चक्राची माहिती देण्यासाठी श्री जी.एल.आगरवाल यांना स्टेजवर बोलविण्यात आले. त्यांनी श्रीमाताजींच्या पूर्वीच्या भाषणांच्या आधारे सदर माहिती सांगितली. त्यानंतर, नानक मोहम्मद हे भजन झाले.त्यानंतर नाभी व भवसागर चक्रावरील श्रीमाताजींची अमृतवाणी सर्वांनी ऐकली. त्यानंतर नाभी व भवसागराच्या रागावर सर्वांनी ध्यान केले.

त्यानंतर हृदय चक्राची माहिती सांगण्यासाठी श्री सुदर्शन शर्मा यांना बोलविण्यात आले. त्यांनी हृदय चक्राची माहिती सांगताना श्रीमाताजींच्या पूर्वीच्या भाषणाचा आधार घेत माहिती सांगितली. त्यानंतर माता ओ माता हे भजन झाले. त्यानंतर हृदय चक्रावरील श्रीमाताजींची अमृतवाणी सर्वांनी स्टेजवरील स्क्रीनवर पाहिली. त्यानंतर हृदय चक्राचा राग लावून सर्वांनी ध्यान केले.

गोवा कलेक्टीव्हीटीचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरवातीला ब्रह्मशोधिले ब्रह्मांड मिळाले, गुरू एक जगीचा दाता, माँ तेरे निर्मल प्रेमको मेरा शत शत प्रणाम, अनाथाच्या नाथा तुझ नमो,जय अखिलेश्वरी, माहेश्वरी, श्री गणेशा जय श्री गणेशा, शेवटी गोंधळावर ८ मुलींनी नृत्य करून सर्वांची वाहवा मिळविली. त्यानंतर कलकत्त्याचे श्री रुस्तम सरकार यांचे स्टेजवर आगमन

झाले. त्यांनी गिटारवर राग सादर केला. त्याला श्री दलाल यांनी तबल्यावर साथ दिली.

रात्रीच्या जेवणानंतर सर्वजण एकत्र जमले. वेगवेगळ्या शहरातून भाग घेतलेल्या स्पर्धकांच्या गाण्याचे आयोजन केले होते. सदर स्पर्धेचे सूत्रसंचालन श्री पराग राजे याच्याकडे सोपविले होते. सुरवातीला स्पर्धेसाठी असलेल्या परीक्षकांना स्टेजवर बोलविण्यात आले. त्यामध्ये सुरवातीला प्रथम परीक्षक श्री अरुण आपटे यांनी स्टेजवर येऊन अबिर गुलाल हे भजन सादर केले. दुसरे परीक्षक श्री सुब्रमण्यम, श्री धनंजय धुमाळ, श्री शाम जैन, श्री मुखिराम सर्वजण स्टेजवर येऊन प्रत्येकाने आपले दोन शब्द व गाण्याचा मुखडा सुनविला. त्यानंतर सर्व परीक्षक स्टेजसमोरच्या टेबलावर बसले. त्यांना मार्क देण्यासाठी कागदपत्रे देण्यात आली होती. स्टेजच्या एका कोपऱ्यात स्पेशल कॅामेंट्स साठी श्री राजेश गुप्ता, श्री कपिल कुमार, डॅा निगम, श्री पुगालिया यांना आमंत्रित केले होते. बाजूला गाणाऱ्या स्पर्धकाला साथ देण्यासाठी तबल्यासाठी श्री दलाल, सिंथेसायझर साठी श्री काकडे, हार्मोनियमसाठी श्री दलाल ज्युनियर बसले होते.

त्यानंतर भाग घेतलेल्या एकूण दहा कलाकारांनी आपापली गाणी सादर केली. त्यावेळी स्टेजसमोर बसलेले सर्व परीक्षक त्यांचे मार्क देत होते. तर वरती बसलेले सर्व स्पेशल कॅामेंन्ट करणारे प्रत्येक गायकाविषयी आपली मते मांडत होते. सदर कार्यक्रम अतिशय सुंदर झाला. कार्यक्रमाच्या शेवटी परीक्षकांचे मार्क वाचून दाखविण्यात आले. त्यामध्ये मुंबईची कु. श्रुती नाईक हिला प्रथम पारितोषिक तर पुण्याची सौ प्राजक्ता धायडे आणि चंद्रपूरच्या त्र्यंबक धायडे याला दुसरा क्रमांक देण्यात आले. सर्व कलाकारांना बक्षिसे देण्यात आली. अशा प्रकारचा सहजयोगात पहिल्यांदाच कार्यक्रम घेतला असल्याने खूप चांगला वाटला. सर्वांना बसल्या जागेवर चहा देण्याची व्यवस्था केली होती.

यानंतर नाशिकच्या धुमाळ आणि सहकारी तसेच श्री शाम जैन यांचे ग्रुपबरोबर स्टेजवर रात्री ११.०० च्या सुमारास आगमन झाले. त्यांनी तुने मुझे बुलाया शेरावालीये यासारखी नवीन नवीन भजने, कव्वाली सादर करीत सर्वांना रात्री १.०० वाजेपर्यत नाचविले.

### १३, ऑक्टोबर २००७

आजच्या कार्यक्रमाची सुरवात सकाळी ६.३० च्या सुमारास सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर सर्वजण समुद्रावर सामूहिक मीठपाण्यासाठी जमले होते. बाजूला स्पिकर्स लावले होते. स्पिकरवर सामूहिक मीठ-पाणी सर्वांकडून करून घेताना तीन महामंत्र, गणपतीअथर्वशीर्ष, सामूहिक विशुद्धीची स्वच्छता (अल्ला हू अकबर) त्यानंतर सर्वजण समुद्र स्नानाचा आनंद घेऊन नाष्टा घेऊन परत मुख्य पेंडॅालमध्ये हवनासाठी एकत्र जमले.

साधारण १०.०० च्या सुमारास श्री पुगालिया व सर्व निमंत्रितासह हवनास सुरवात झाली. त्यावेळी पुणे म्युझिक ग्रुपने तीन महामंत्र, श्री गणेश मंत्र व श्रीमाताजींची १०८ नावे हवनाच्या वेळी घेतली. त्यानंतर आरती झाली. आरतीनंतर श्री मुखिराम यांना गाणी म्हणण्यासाठी स्टेजवर बोलावले. त्यांनी जग गणपतीजी महाराज, जय अंबे जय अंबे जय गणेशजी की माँ अंबे, महामाया महाकाली, माने मोर बोले. महामाया महाकाली , आणि इतर प्रसिद्ध त्यांची गाणी सादर करून सर्वांना नाचविले.

दुपारी जेवणानंतर २.०० वाजता परत सर्वजण पेंडॅालमध्ये जमले त्यावेळी डॅा अरुण आपटे यांनी म्युझिक थेरपी वर कार्यक्रम सादर केला त्यामध्ये त्यांनी नेहमी पूजेत म्हणतात ही भजने कशी म्हणावयाची हे सांगताना हासत आली निर्मल देवी घालूनी पैंजण पायी, धुम तानाना धुम तानाना, त्यानंतर तीन महामंत्र कसे म्हणावयाचे ते सर्वांकडून म्हणवून घेतले. तसेच राधाकृष्ण चा मंत्र सर्वांकडून म्हणवून घेतला. शेवटी भैरवीत मिले सूर मेरा तुम्हारा हे गीत सादर करून सर्वांना संगितात सहभागी करून संगीताचा आनंद सर्वांना दिला.

त्यानंतर दिल्लीचे डॅा निगम यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरवातीला त्यांना १९८० साली झालेला पॅरलेसीस श्रीमाताजींच्या कृपेत कसा ठीक झाला हे सांगत असताना सहजयोगावर दिल्ली युनिव्हरसिटीमध्ये डॅाक्टरेट मिळविलेल्या डॅा रॅाय यांच्याबरोबर केलेल्या कामाची तसेच श्रीमाताजींच्या सहवासात त्यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे सहजयोगाच्या माध्यमातून आपले सर्व शारीरिक, मानसिक सर्व प्रश्न सुटू शकतात याबाबत सर्वांच्यात विश्वास निर्माण केला. त्यावेळी अनेक आजारांवर सहजयोगाच्या माध्यमातून उपाय सांगितले. सदर कार्यक्रम अतिशय सुंदर झाला.

त्यानंतर विशुद्धी चक्राबाबत श्री करुण सांधी यांनी माहिती सांगितली. त्यानंतर पुणे मुझिक ग्रुपने वृदावनी वेणू हे

भजन सादर केले. त्यानंतर श्रीमाताजींची विशुद्धी चक्रावरील अमृतवाणी सर्वांनी ऐकली. त्यानंतर विशुद्धी चक्राचा राग लावून सर्वांनी ध्यान केले. त्यानंतर सर्वजण सामूहिक मीठपाण्यासाठी समुद्रावर जमले. त्यावेळी स्पिकरवर सर्वांचे सामूहिक मीठपाणी करून घेतले. त्यानंतर चहापाण्यानंतर सर्वजण परत पेंडॉलमध्ये जमले.

त्यावेळी आज्ञा चक्राची माहिती देण्यासाठी नाशिकच्या श्री सदाशिव शुक्ल यांना बोलविण्यात आले. त्यांनी आज्ञाचक्राची माहिती सांगितली त्यानंतर नमो नमो मारिया हे भजन झाले त्यानंतर श्रीमाताजींचे आज्ञा चक्राविषयी ची अमृतवाणी झाली. त्यानंतर आज्ञाचक्राच्या रागावर सर्वांनी ध्यान केले.

त्यानंतर पुण्यातील लहान मुलींनी ममता मयी माँ दुर्गासी लागे या भजनाच्या कॅसेटवर नृत्य सादर करून सर्वांची वाहवा मिळविली. त्यानंतर मुंबई-ठाणे च्या १० वर्षापासून ६५ वर्षापर्यंतच्या सहजयोग्यांनी बसविलेला महाराष्ट्राची लोकधारा हा अतिशय भव्य कार्यक्रम सादर केला .त्यामध्ये गोंधळ, कोळी नृत्य, सहज दिंडी, देवी नृत्य इत्यादी प्रकार सादर करताना सर्वांना मंत्रमुग्ध केले.

गुजराथच्या कलाकारांनी भजने सादर केली. त्यानंतर घडा नृत्य व शेवटी दांडिया सादर केला त्यावेळी स्टेजवरील सर्व निमंत्रीत तसेच प्रमुखांना दांडिया खेळण्यासाठी स्टेजवर आमंत्रित केले. तसेच संपूर्ण पेंडॉलमध्ये सर्व उभे राहून दांडिया खेळत होते. साधारण हा तासभर कार्यक्रम सुरू होता.

रात्री १०.३० च्या सुमारास सर्वजण परत मुख्य पेंडॉलमध्ये जमले त्यावेळी सुरवातीला वैतरणा म्युझिक ॲकॅडमीचे कार्यक्रम श्री सुब्रमण्यम् यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले. त्यात त्यांनी मेरी माँ की चुनरी लाल रंग की,वंदन करते माँ निर्मल से, छिंदवाडामे जनम हुवा, आखों मे बसी हो तुम, निर्मल माँ निर्मल माँ ही भजने स्वत: सुब्रमण्यम व त्यांचे ॲकॅडमीचे शिष्य यांनी सादर केली. त्यानंतर सर्व पेंडॉलमधील बसलेल्यांसाठी मसाला दूध आणि जिलेबी जागेवरच देण्यात आली. त्यानंतर रात्री ११.०० च्या सुमारास श्री मुखिराम आणि सहकारी यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सहजी पुकार चले आज आवो मेरी निर्मल माँ,भवन मे आजा के मैया शेरा वाली, भोले बाबा चले कैलाश, मेरा कोई ना सहारा बिन तेरे, इत्यादी रात्री १.३० पर्यंत भजन सादर करीत होते. त्यावेळी पेंडॉल मधील सर्व सहजयोगी नाचत होते.

**१४,ऑक्टोबर २००७**

आजच्या पूजेच्या दिवसाची सुरवात सकाळी ६.३० ते ७.०० सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर सर्वजण सामूहिक मीठ पाण्यासाठी समुद्रावर जमले. त्याठिकाणी स्पिकरवर सर्वांचे सामूहिक मीठपाणी करून घेतले. त्यानंतर सर्वजण सकाळचा नाश्टा करून परत पेंडॉलमध्ये १० च्या सुमारास जमले.

त्यावेळी सहस्रार चक्राची माहिती श्री राजेंद्र पुगालिया यांनी दिली. तसेच श्रीमाताजींच्या सहवासातील काही माहिती दिली. त्यानंतर ध्यान ते रंगले सहस्रार द्वारी हे भजन झाले. त्यानंतर श्रीमाताजींची सहस्रारावरील अमृतवाणी झाली. शेवटी सहस्रारावरील रागावर ध्यान घेतले. त्यानंतर श्री राजेंद्र पुगालिया यांनी मुख्य कलाकारांना स्टेजवर बोलावून त्यांचा सत्कार केला. तसेच सर्व कमिटी प्रमुखांना स्टेजवर बोलावून सेमिनारसाठी त्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. त्यानंतर साधारण १२.०० च्या सुमारास पूजेला सुरवात झाली.

श्रीमाताजींची साधारण १० वर्षे ज्या जागेवर साकार पूजा होत असे त्याच स्टेजवर श्रीमाताजींची निराकार पूजा आयोजित केली होती. पूजेसाठी पेंडॉलमधील सर्व १०-११ वर्षापर्यंतच्या मुला/मुलींना स्टेजवर बोलावले होते. पूजेच्या सुरवातीला स्वागत गीत झाले. पुजेसाठी पुणे म्युझिक ग्रुप, श्री सुब्रमण्यम, श्री धुमाळ आणि सहकारी, श्री शाम जैन, श्री मुखिराम आणि सहकारी आणि श्री आपटे यांनी गाणी सादर केली. त्यामध्ये सुरवातीला बिनती सुनिये, गणेश अथर्वशीर्ष, जग दुर्गे दुर्गती, जय जय हो महिमा तेरी, नाशिक जोगवा, निर्मला किती वर्णावी तुझी ग स्तुती, महामाया महाकाली, हासत आली, विश्ववंदिता, शेवटी आरती.

पूजेनंतर श्री सुब्रमण्यम यांनी माँ हमारी वंदना, जय निर्मल माँ पुणे म्युझिक ग्रूपने माता ओ माता, माता का करम है मेरी माता का करम है, त्यानंतर श्री मुखिराम आणि सहकारी यांनी त्यांची अनेक प्रसिद्ध भजने गाऊन सर्वांना नाचविले. कार्यक्रम संपला तेव्हा संध्याकाळचे ४.०० वाजून गेले होते.

सर्व सहजयोगी अतिशय आनंदात प्रचंड चैतन्यात आपापल्या घराकडे निघाले ● ● ●

## गोष्टीरूप संपूर्ण श्री दुर्गासप्तशती

(देवी माहात्म्य) संक्षिप्त

तसे पाहिले तर देवी ही नित्यस्वरुपा आहे. अखिल विश्व हे तिचेच रूप आहे. तिनेच सर्व जगाला व्यापले आहे. ती विविध रूपांनी प्रगट होते. ती अजन्मा आहे. पण देवांचे संकट दूर करण्यासाठी ती अवतार घेते.

ही आदीदेवी महामायारूपाने कशी उत्पन्न झाली ते पाहूया.

फार जुनी गोष्ट आहे. जलप्रलय झाला होता. सर्व पृथ्वी जलमय झाली होती. त्या विस्तीर्ण सागरात श्रीविष्णू भगवान योगनिद्रेत झोपले होते. त्यांच्या कानाच्या मळापासून दोन भयंकर राक्षस निर्माण झाले. एकाचे नाव मधू आणि दुसऱ्याचे नाव कैटभ असे होते. उत्पन्न झाल्याबरोबर त्यांचे लक्ष श्रीविष्णूच्या नाभीतून निघालेल्या कमळावर बसलेल्या ब्रह्मदेवाकडे गेले. ब्रह्मदेवाचेही लक्ष या मधु-कैटभांकडे गेले आणि त्यांचा एकंदर रागरंग व लक्षणे पाहून, आपली काही धडगत नाही हे त्यांनी हेरले.

आता काय करायचे? भगवान तर झोपले आहेत. तेव्हा त्याने त्या ईश्वराच्या अधीश्वरीची, त्या जगदाधार, विश्वपालन व संहार करणाऱ्या योगनिद्रेची स्तुती केली.

ब्रह्मदेव म्हणाले-हे देवी ! तूच सर्वस्व आहेस.तूच संजीवनी आहेस. तूच ओमकार स्वरूप आहेस. तूच जगदाधार, विश्वनिर्माणकर्ती व संहारक आहेस. तू स्वाहा, स्वधा, वषट्कार आहेस. तूच महाविद्या, महामेधा, महास्मृती, महामोहरूपा, महादेवी, महासुरी आहेस. तूच भयंकर कालरात्री, महारात्री व मोहरात्री आहेस. तूच श्री, ईश्वरी, र्‍हीं, बुद्धी, लज्जा, पुष्टी, तुष्टी, शान्ती आणि क्षमा सर्व काही आहेस. तू आपल्या हातात खड्ग, शूल, गदा, चक्र, शंख, धनुष्यबाण, परीघ ही आयुधे धारण केलेली आहेस. तू जितकी उग्र व कठोर आहेस तितकीच सुंदर व कोमलही आहेस. तू अनंतशक्ती आहेस. प्रत्यक्ष भगवान विष्णूलाही तू निद्रेने अधीन करून घेतलेस. तूच मला, विष्णूला व शंकराला शरीरधारी केलेस. हे जगदंबे, मी तुझी स्तुती करण्यास असमर्थ आहे. हे देवी, तू या मधु-कैटभांना मोहवश कर आणि विष्णूला लवकर जागे करून त्यांना या राक्षसाला मारण्याची बुद्धी दे.



ती देवी योगनिद्रा या स्तुतीने प्रसन्न झाली तिने भगवंताला जागे केले. विष्णू भगवान उठून बसले, आणि त्यांना लाल लाल डोळ्यांनी ब्रह्मदेवाला खाऊ की गिळू पाहणारे दोन राक्षस दिसले.

विष्णू व मधु-कैभट यांची पाच हजार वर्ष कुस्ती (बाहूयुद्ध) झाली. शेवटी राक्षस श्रीविष्णूंना म्हणाले, तुझ्या पराक्रमावर आम्ही खुश आहोत. तुला काय हवे ते माग, तुला मिळेल.विष्णू म्हणाले -मला दुसरे काही नको. फक्त माझ्या हातूनच तुम्हा दोघांचा मृत्यू यावा एवढेच मागणे आहे. राक्षस म्हणाले-ठीक आहे. तुझ्या मनाप्रमाणेच होईल. केवळ जेथे पृथ्वी कोरडी असेल तेथे तू आम्हाला मार म्हणजे झाले.मधू-कैटभांना सर्वत्र पाणीच पाणी दिसत होते. कोरडी जमीन सापडणार नाही याची त्यांना खात्री होती. पण विष्णूंनी आपल्या मांडीवर त्यांची मस्तके ठेवून सुदर्शनचक्राने धडावेगळे केली.

### महिषासूराच्या सेनेची दाणादाण

फार फार वर्षापूर्वी एकदा देव-दैत्यांत भयंकर युद्ध झाले. देवांचा नायक इन्द्र होता. दैत्यांचा प्रमुख होता महिषासुर. त्यात देवांचा पराजय झाला. दैत्य जिंकले. महिषासुर सिंहासनावर बसला.

पराभूत झालेले देव विष्णू व महादेवाकडे गेले व म्हणाले- हरीहरांनो, महिषासुराने आम्हांला जिंकून इन्द्र-सूर्य-अग्नी-वायु-चन्द्र-यम-वरुण यांचे अधिकार काढून घेतलेत. आम्हांला स्वर्गातून हद्दपार केले आहे. तोच एकमेव राजा झालाय. आम्ही मृत्यूलोकात वणवण हिंडत आहोत. त्या महिषासुराची काहीतरी व्यवस्था करा.

ही देवांची करुण कहाणी ऐकून हरीहरांना खूप राग आला. त्यांचे डोळे इंगळासारखे लाल झाले. कपाळाला आठ्या पडल्या.

श्रीविष्णूच्या तोंडातून एक मोठे तेज बाहेर पडले. त्याबरोबर ब्रह्मदेव,शंकर, इन्द्र आदी देवांच्या अंगांतूनही ते तेजोगोल बाहेर पडले. हे सर्व तेज एकवटले आणि त्याने नारीरूप धारण केले.

त्या नारीचे मुखकमल शिवशक्तीचे झाले, यमतेजाने केशकलाप झाला, विष्णुतेजाने बाहू झाले, चंद्रतेजाने दोन्ही स्तनमंडळे झाली, इंद्रतेजाने कटी झाली.वरुणतेजाच्या मांड्या व पोटऱ्या झाल्या. पृथ्वीतेजाने नितम्ब झाले, ब्रह्मदेवाच्या तेजाने दोन्ही पाय, सूर्यतेजाने पायांची बोटें, वसूंच्या तेजाने हाताची बोटे, कुबेराच्या तेजाने सुंदर नाक, प्रजापतितेजाने सुंदर दंतपंक्ती, अग्नितेजाने तीन डोळे, संध्यातेजाने बुवया व वायुतेजाने कान झाले. या समस्त देवांच्या तेजाने नटलेले ते जेज:पुंज देवीरूप पाहून देवांना धीर आला.

मग त्या सर्व देवांनी तिला तऱ्हेतऱ्हेची शस्त्रास्त्रे दिली. शंकराने त्रिशुळ, विष्णूने चक्र, वरुणाने शंख, अग्नीने शक्ती, वायुने धनुष्य व दोन भरलेले बाणांचे भाते,इंद्राने वज्र व ऐरावताची घंटा, यमाने काळदंड, वरुणाने पाश, प्रजापतीने स्फटिकांची माळ व ब्रह्मदेवाने कमंडलू दिला.

सूर्याने आपले तेज दिले, काळाने ढाल व तलवार दिली. क्षीरसागराने दिव्यहार व जीर्ण न होणाऱ्या दोन शाली दिल्या, त्याच बरोबर कुंडले, अर्धचंद्र, बाजूबंद, पायांतील पैंजण, रत्नहार व अंगठ्या दिल्या. विश्वकर्म्याने परशू, अनेक अस्त्रे, अभेद्य कवच व न कोमेजणाऱ्या कमळाचे हार दिले. समुद्राने सुंदर फूल दिले. कुबेराने मदिरेसह मदिरापात्र दिले. सारांश, प्रत्येक देवाने तिला काही ना काही बहुमोल अलंकार अथवा युद्धोपयोगी साहित्य भेट म्हणून दिले.

## जयघोष

त्यानंतर देवांनी मोठी गर्जना केली. त्या गर्जनेने आकाश गुंजले, पृथ्वी कापू लागली, पर्वत हलू लागले. तेव्हा सर्वांनी देवीचा विजय असो असे म्हणून देवांप्रमाणेच मोठमोठ्या ऋषींमुनींनी देखील देवीची स्तुती केली. त्रैलोक्यसुंदरी देवीचे ते उग्र स्वरूप पाहून दैत्यही लढण्यास तयार झाले. देवीची भीषण गर्जना दैत्यराज महिषासुरानेही ऐकली होती. तो आवाजाच्या दिशेने सैन्य घेऊन कोण आहे तो प्रतिस्पर्धी असे ओरडत धावला. तिथे पोहचताच त्याने समोर देवीला पाहिले. तिला हजार हात होते.तिच्या धनुष्याच्या नुसत्या टणत्काराने सप्तपाताळापर्यंत घबराट झाली होती. तिचे मुखमंडळ दीप्तिमान होते. तिच्या मस्तकावरील मुकुट आकाशाला भिडला होता.

अशा त्या देवीला पाहून त्याने रणगर्जना केली व युद्ध सुरू झाले. दैत्यसैन्याच्या एका विभागाच्या चिक्षुरासुर हा अधिपती होता. तो देवीशी लढू लागला. दैत्यसेना अफाट होती. त्यात चामुर होता. साठ हजार सैन्यासह -उदग्र- होता. एक कोटी रथांसह -महाहनु होता. पाच कोटी सैन्यासह -असिलोमाचे- होते. साठ लाख रथसैन्य घेऊन -बाष्कल- आला होता. एक कोटी हत्ती व घोडदळ, पाच कोटी रथवीरांसह बिडाल होता आणि इतरही अनेक वीर रणांगणात युद्धासाठी उतरले होते. स्वत: महिषासुर जातीने सहस्र कोटी अश्वदळ, गजदळ व पदाती घेऊन रणांगणावर उपस्थित होता.

उभयपक्षांत घनघोर युद्ध झाले. देवीला मारण्याचा ते दात ओठ खाऊन प्रयत्न करीत होते. असुरांजवळ तोमर, मुसळ, तलवार, परशू,गोफणगोटे, गदा इत्यादी आयुधे होती. पण त्यांचा उपयोग होत नव्हता. त्यातही रणभूमीवर देवी नि:श्वास सोडत होती. त्या दर नि:श्वासातून एक एक गण आयुधांसह उत्पन्न होऊन दैत्यसेनेशी लढू लागे. तितक्यात देवीचा वाहन सिंह हाही चिडून उठला. एखाद्या वणव्याप्रमाणे तो शत्रुसैन्यात घुसला. आणि मग एकच रणधुमाळी माजली. देवीचे गण ढोल व नगारे बडवून-बडवून शत्रुसैन्यावर तुटून पडत व त्यांचा संहार करीत. देवीनेही कहर केला. तिने त्रिशूळ, गदा, तलवारीने दैत्यांचा फडशा पाडणे आरंभले. तिच्या मुसळमाऱ्याने असंख्य रक्त ओकू लागले. तिने सोडलेल्या बाणांनी पुष्कळांची कंबरडी मोडली. कित्येकांचे हात तुटले. काहींच्या माना तुटल्या. देवीच्या पराक्रमाने शोणिताच्या नद्या वाहू लागल्या. प्रेतांचे ढीग पडले, **चुटकीसरशी जगदंबेने त्या विराट शत्रुसेनेचा बीमोड केला**. देवांनी आकाशातून पुष्पवृष्टी केली.

## चिक्षुर व चामराचा वध

आपल्या सैन्याची अशी दाणादाण झालेली पाहून सेनापती चिक्षुरासुराच्या अंगाची लाहीलाही झाली. तो आता जातीने लढू लागला. मेरुपर्वतावर ढगांनी जशी मुसळधार पावसाची संततधार धरावी त्याप्रमाणे चिक्षुराने देवीवर बाणांचा पाऊस पाडला. देवीने आपल्या बाणांनी राक्षसाच्या बाणांना सहजलीलेने तोडून टाकले.





चिल्ड्रन पार्टी, २३ सप्टेंबर २००७









# लग्न समारंभ, १५ सप्टेंबर २००७











## लग्न समारंभ, १५ सप्टेंबर २००७











# श्री माताजींचे ऑस्ट्रेलिया आगमन, ११ सप्टेंबर २००७













इतकेच नव्हे तर त्याचा रथ,रथाचा घोडा व सारथीही मारला. त्याचे धनुष्य मोडले तेव्हा चिक्षुर देवीवर ढाल-तलवार घेऊन धावला. त्याने आपल्या तीक्ष्ण तलवारीने सिंहाच्या मस्तकावर वार केला. मग त्याने देवीच्या दंडावर वार केला. दंडावरच तलवार मोडली. हे पाहून राक्षस रागाने लालबुंद झाला. त्याने देवीवर त्रिशूळ फेकला. तिने आपल्या त्रिशूळाने त्याचे तुकडे केले व चिक्षुराच्या शरीराच्याही चिंधड्या केल्या. चिक्षुर पडल्यावर हत्तीवर बसलेला चामर पुढे सरकला. त्याने देवीवर शक्ती टाकली. नुसत्या हुंकारानेच देवीने तिचा नायनाट केला. तितक्यात सिंह उडी मारून हत्तीच्या गंडस्थळावर बसला व चामरावर त्याने हल्ला केला. दोघांची गुत्थमगुत्थी होऊन दोघेही हत्तीवरुन खाली पडले. सिंहाने पंजा मारून त्याचे डोके धडावेगळे केले. चामरही संपला. देवीने झाड उपटून त्याने उदग्राला ठार मारले.मग देवीने पटापट बाष्कल, ताम्र, अन्धक इत्यादी अनेक राक्षसांना यमाकडे पाठविले.आपले सर्व सेनापती धारातीर्थ पडलेले पाहून महिषासुर खवळला.

## युद्धस्य वार्ता रम्या

आपले सर्व साथीदार, सेनापती मारले गेलेले पाहून महिषासुराने रेड्याचे रूप धारण केले. हा रेडा मान खाली घालून मुसंडी मारून चौखूर धावत देवीसैन्यात शिरला व धुमाकूळ माजवू लागला. कोणाला मुसंडी मारून घायाळ केले, कोणला शिंगांनी भोसकले, कोणाला लाथ मारल्या, कोणाला पायांखाली तुडविले व कोणाला शेपटीचे तडाखे देऊन व काहींना मोठमोठया गर्जना करून घाबरवून सोडले. गण पांगलेले पाहून महिषासुर देवीच्या सिंहाला मारण्यास धावला. हे पाहून देवी संतापली. तिकडे रेडा बनलेला महिषासुर रागारागात खुराने जमीन उकरत होता व आपल्या शिंगानी पर्वत फेकत होता. त्याच्या धडक्यांनी पृथ्वी डळमळू लागली व शेपटीच्या तडाख्याने समुद्र भयंकर खवळला. लाटा उंच उंच उसळू लागल्या. त्याच्या फुफाट्याने शेकडो पर्वत आकाशात उंच उडून पृथ्वीवर पडत होते. अशा त्या महिषासुराला येताना पाहून देवीने त्याच्यावर पाश टाकून त्याला बांधून टाकले. तेव्हा त्याने सिंहाचे रूप धारण केले. देवी आता त्याला मारणार तोच त्याने वीराचे रूप घेतले. त्याच्यावर देवी बाण सोडू लागली तोच त्याने हत्तीचे रूप घेतले व देवीच्या वाहनाला म्हणजे सिंहाला सोंडेने ओढू लागला. देवीने तलवारीने त्याची सोंड छाटली. तितक्यात तो पुन्हा रेडा झाला. साऱ्या जगाचा थरकाप झाला.

देवी उत्तम मधाने भरलेले असे प्याल्यावर प्याले पिऊ लागली. तिचे डोळे लालबुंद झाले. रेडा मोठ्याने रेकू लागला. त्याला देवी म्हणाली - मूर्खा थांब, थांब, उन्मत्त होऊन रेकू नकोस, मी तुला ठार मारणार आहे. इतके बोलून देवीने पोटभर मधुप्राशन केले आणि त्याच्या अंगावर उडी मारली. त्याला पायांखाली दाबून धरले. तितक्यात रूप बदलण्यासाठी तो रेडयामधून बाहेर निघू लागला. जगदंबेच्या हे लक्षात येताच तिने त्याचे शिर कापले. राक्षस मेला. देवांना आनंद झाला व ते देवीचा जयजयकार करू लागले.

## देवीची स्तुती

महिषासूर मेल्याने देवांना फार आनंद झाला. ते देवीची स्तुती करू लागले.ते म्हणाले.- हे देवी ! तू अत्यंत पराक्रमी व दुष्ट अशी महिष राक्षसाला मारलेस. त्याच्या अफाट सेनेचा विध्वंस केलास. तुला आमचा नमस्कार असो. हे देवी, सर्व देवांचे तेज तुझ्यात एकटवले आहे. तू सव देव, ऋषी यांना पूज्य आहेस. हे जगदंबे, आमचे तुला भक्तिपूर्वक नमस्कार असो, हे देवी, आमचे कल्याण कर. तुझे गुणवर्णन करण्यास ब्रह्मा, विष्णू आणि महादेवही असमर्थ आहेत. हे भगवती चण्डिके ! तू या अखिल जगाचे पालन कर, अशुभाचा व भयाचा नाश कर. हे देवी ! तू पुण्यवंतांच्या घरात लक्ष्मीरूपाने नांदतेस, पाप्यांच्या घरात्त तू दारिद्यरुपाने वावरतेस. हे देवी ! शुद्ध हृदयातील बुद्धी तूच आहेस, मेघा तूच आहेस. जगात सर्वरूपाने तू नटली आहेस. या अथांग भवसागरातून पैलतीराला नेणारी नौका तूच आहेस. तूच आमचे सर्वस्व आहेस. तू ज्यांच्यावर प्रसन्न होतेस,त्यांची तू भरभराट करतेस, याउलट तू रागावलीस तर त्यांचा नायनाट करतेस.तू जिकती कठोर आहेस तितकीच मायाळूही आहेस. तू राक्षसांना मारून त्यांचा उद्धार व प्राणिमात्रांना निर्भय केले आहेस. हे देवी, हे महिषासुरमर्दिनी, हे दुर्गे, तू आमचे असेच सतत रक्षण कर.आम्ही जेव्हा तुझे स्मरण करू तेव्हा तू आम्हाला दर्शन द्यावेस. आम्ही तुला काय मागावयाचे? आमच्या सर्व इच्छा तू आधीच पूर्ण केल्या आहेस. हे देवी, तू नेहमी आमच्यावर प्रसन्न रहा.....

देवांनी अशा प्रकारे स्तुती केल्यावर, तथास्तु म्हणून भद्रकाली देवी तेथेच गुप्त झाली. पुढे ती गौरी रुपात प्रगट झाली

आणि तिने शुंभ-निशुंभाचा वध केला.

## शुंभ-निशुंभांचा संहार.

फार फार वर्षापूर्वी शुंभ व निशुंभ या नावाचे दोघे राक्षसबंधू होऊन गेले. त्यांनी आपल्या सामर्थ्याने इन्द्राला लढाईत हरवून त्याचे त्रैलोक्याचे राज्य हिसकावून घेतले. सूर्य, चंद्र, कुबेर, यम,वरुण, अग्नी आणि वायू यांना हाकलून दिले व त्यांचे अधिकार काढून घेतले. शुंभ आता स्वर्गाचा राजा झाला.

सगळ्या देवांना जगदम्बेची आठवण झाली. तिने महिषासुराचा वध केल्यानंतर देवांना वर दिला होता,संकटात मी तुमचे रक्षण करीन म्हणून.

देव हिमालयात गेले, भगवती विष्णुमायेची स्तुती करू लागले. ते म्हणाले, हे देवी विष्णुमाये ! तुला आमचा नमस्कार असो.

नमो दैव्यै महादेव्यै शिवायै नम: ।
नम: प्रकृत्यै भद्रायै नियता: प्रणता: स्मताम् ।

तू चेतना, बुद्धी, निद्रा, क्षुधा, छाया, शक्ती, तुष्णा, क्षमा, शांती, लज्जा,श्रद्धा, कांती, लक्ष्मी, स्मृती, तुष्टी, मातृत्व, भ्रांती आदी अनेक रूपांनी प्राणिमात्रांत राहतेस. तुला आमचा नमस्कार असो. आमचे दैत्यांपासून रक्षण कर.

येणेप्रमाणे देवीची स्तुती चालली असता हिमनगकन्या आदिमाता पार्वती स्नानाला तेथे आली. तेथे देवांना बहुसंख्येने उपस्थित असलेले पाहून ती म्हणाली- तुम्ही येथे एकत्र जमून कोणाला आळवित आहात? तितक्यात तिच्याच शरीरातून शिवादेवी उत्पन्न होऊन ती म्हणाली,-ते माझीच स्तुती करीत आहेत. शुंभ-निशुंभ बंधूंनी त्यांना अपमानित करून स्वर्गाबाहेर काढले आहे.

शिवादेवी -कौशिकी- या नावाने ओळखली जाते. पार्वतीच्या शरीरातून ती बाहेर पडल्यावर पार्वतीचा रंग कृष्ण झाला आणि ती कालिका या नावाने प्रसिद्ध झाली.

हे सर्व चालले असता चंड व मुंड नावाचे शुंभाचे दोन सेवक फिरत फिरततेथे आले. कौशिकेचे अप्रतिम लावण्य पाहून ते स्तिमीत झाले. आल्या पावली ते मागे फिरले.

शुंभासुराला भेटून ते म्हणाले- महाराज, हिमालय पर्वतावर आज आम्ही एक अत्यंत लावण्यवती अशी स्त्री पाहिली. तिच्या मनोहर लावण्यतेजाने सारा हिमालय उजळून निघाला आहे. इतके अनुपम लावण्य आजपर्यंत कधी पाहिले किंवा एकलेही नव्हते. महाराज, आपली पट्टराणी ती शोभून दिसेल. ते श्रेष्ठ स्त्रीरत्न आपणासच योग्य आहे. कारण, हे दैत्येश्वरा ! साऱ्या जगातील यच्चयावत उत्तमोत्तम वस्तू आपल्या संग्रहात आहेत. गजश्रेष्ठ ऐरावत, अश्वोत्तम उच्चै:श्रवा, वृक्षोत्तम प्राजक्त, हंसवाही विमान, महापद्म खजिना, किंजल्किनी माळ, सुवर्णवर्षाव करणारे वरुणछत्र, प्रजापतीचा रथ, दिव्य रत्ने, माणके हे सर्व आपल्याजवळ आहे. महाराज, उणीव केवळ स्त्रीरत्नाची आहे. ती समोर आहे. तिच्याविना हा आपला अनमोल संग्रह म्हणजे फाफटपसाराच ठरेल.

चंडमुंडाचे भाषण ऐकून शुंभासुराने दूतकार्यासाठी सुग्रीवाला असे, असे बोल वगैरे सांगून, पढवून पाठविले.त्याप्रमाणे सुग्रीव हिमालयावर गेला व देवीला भेटून मोठ्या गोड शब्दात तो तिला म्हणाला- देवी, त्रैलोक्याचे स्वामी दैत्यराजराजेश्वर श्री शुंभ महाराजांनी मला आपल्याकडे पाठविले आहे.देवी हसली व म्हणाली - हे दूता, तुझ्या स्वामीचे काय म्हणणे आहे, ऐकू दे मला.

दूत म्हणाला- देवी, महाराज म्हणतात, त्रैलोक्यातील सर्वश्रेष्ठ रत्ने आमच्या संग्रही आहेत. देव आमचे दास आहेत. तू एक जगातील अनुपम व अनमोल असे स्त्रीरत्न आहेस असे आमच्या कानावर आले आहे. आम्ही तुझ्यावर प्रसन्न आहोत,तेव्हा वेळ न दडवता लवकरात लवकर आमच्या अंत:पुरात येऊन दाखल व्हावे. आम्ही तुझा पट्टराणी म्हणून स्वीकार करू.

सुग्रीवाचा हा निरोप ऐकून भगवती हसली व म्हणाली- दूता तुझे म्हणणे अक्षरश: खरे आहे. तो तिन्ही जगाचा स्वामी आहे. पण माझी प्रतिज्ञा आहे की जो मला युद्धात जिंकेल त्याच्याशीच मी लग्न लावेन.

हे ऐकून सुग्रीव म्हणाला-देवी ! आपणास भलताच गर्व झालेला दिसतोय. आमच्या महाराजांसमोर लढाईत टिकू शकेल असा त्रिभुवनात तरी मला कोणी वीर दिसत नाही. असा वीर अद्यापि जन्मलेला नाही.देवादिकही ज्यांच्यापुढे टिकू शकले नाहीत त्यांच्यापुढे आपणासारख्या एका स्त्रीचा काय पाड? आपण सुज्ञ आहात. आपण माझे ऐकून मजबरोबर चलण्याची तयारी करावी हे उचित. त्यात आपला गौरव आहे. आपण जर मजबरोबर आला नाहीत तर दैत्येश्वरांचा आपल्यावर कोप होईल आणि ते आपल्याला

केसांना धरून फरफटत नेतील.दूता ! देवी म्हणाली- तू म्हणतोस ते योग्य आहे. पण मी प्रतिज्ञा केली आहे ती बदलता येणार नाही. तू परत जा आणि माझा निरोप त्यांना सांग. त्यांना जे योग्य दिसेल ते ते करतील.निरोप घेऊन सुग्रीव परतला व सर्व घडलेला वृत्तांत त्याने दैत्येश्वराला निवेदन केला.शुंभासुर या अपमानाने पेटला. त्याने धूम्रलोचनाला, देवीला पकडून आणण्याची आज्ञा केली.

धूम्रलोचन साठ हजार सैन्य घेऊन हिमालयावर गेला. देवीने त्याला जाळून मारले व तिच्या सिंहाने असूरसेनेचा निकाल लावला.हे वर्तमान शुंभासुराला कळताच त्याने चंडमुडाला देवीला पकडून आणण्यास पाठविले.

चतुरंग सैन्य घेऊन चंडमुंड हिमालयात देवीला आणण्यासाठी गेले. चंडमुंड मारले गेले व असुर सैन्य पळत सुटले. ही बातमी कळताच शुंभासुर जास्तच चेकाळला.त्याने उदायुध,कम्बू, कोटीवीर्य, धौम्र, कालक, दौर्हद, मौर्य व कालीकेच या सर्व सेनानायकांना आपापल्या सैन्यासह लढण्यासाठी पाचारण केले. स्वत: शुंभासुर जातीने आपले राखीव सैन्य घेऊन रणांगणात उतरला.

देवीने या सर्व फौजफाट्यासह शुंभासुराला येताना पाहिले आणि आपल्या गणांना तिने रणवाद्ये वाजविणाची आज्ञा केली. तेवढ्यात ब्रह्मदेव, स्कन्द, महादेव,विष्णू व इंद्र यांच्या शक्ती देवीच्या साह्यार्थ आल्या. ब्रह्मदेवाची ब्रह्माणी हंस विमानातून आली. तिच्या हातात अक्षमाला व कमंडलू होता.महादेवाची शिवानी नंदीवर बसून आली. तिच्या हातात त्रिशुळ होता, दंडावर बाजूबंद होता, मस्तकावर चंद्रकोर होती. कार्तिकेयाची शक्ती मोरावर बसून आली. विष्णुशक्ती गरुडावर बसून आली. तिच्या हातात शंख,चक्र,गदा,शारंग धनुष्य व खड्ग होते. इंद्राची शक्ती इंद्राणी ऐरावतावर बसून आली. तिच्या हातात वज्र होते.

तेव्हा देवशक्तीच्या मध्ये असलेले महादेव चंडिकेला म्हणाले-तू या सर्व राक्षसांचा शक्य तितक्या लवकर निकाल लाव म्हणजे मला बरे वाटेल. तेव्हा देवीच्या शरीरातून अत्यंत भयानक अशी अपराजिता शक्ती निघाली. महादेवाला ती म्हणाली, महाराज ! माझ्याकरीता आपण शुंभासुराकडे जा व त्याला सांगा की तुला जिवंत राहावयाचे असेल तर इंद्राचे राज्य त्याला देऊन पाताळात जा. सगळ्या देवांचे अधिकार व पदे त्यांना परत कर व सुखाने रहा. पण शक्ती व पराक्रमाच्या मस्तीच्या गुर्मीत असेल तर लढण्यास ये. राक्षसमांसाची चव तरी कोल्ह्याकुत्र्यांना घेऊ दे.

शंकराने देवीचा निरोप शुंभासुराच्या कानावर घातला. तो निरोप ऐकून दैत्येश्वर चेकाळले.युद्धाला तोंड लागले. देवी व गण दैत्यांशी भिडले. हातघाईची लढाई सुरू झाली. प्रेतांचा खच पडला. रक्ताच्या नद्या वाहू लागल्या.

रक्तबीज नावाचा महादैत्य देवीवर धावला. देवीने त्याच्यावर आक्रमण करून देवी म्हणाली, अग चामुंडे, याचे रक्त भूमीवर पडू न देता भराभर पी व याच्या रक्तबिंदूपासून उत्पन्न होणाऱ्या दैत्यांनाही पटपट गट्टायस्वाहा कर. सर्व मातृगण भिडल्या व त्यांनी सर्व रक्त शोषण करुन रक्तबीजाला नष्टजीवन केले. तो पडल्यावर निशुंभासुर दातओठ खाऊन देवीवर धावला. दोघांत घनघोर संग्राम झाला.देवीने त्रिशूळाने त्याची छाती फोडली. त्यातून थांब , थांब, मी तुला ठार मारतो असे ओरडत एक योद्धा निघाला. देवीने क्षणही न गमावता त्याचे मस्तक आपल्या तलवारीने धडावेगळे केले.

निशुंभ पडल्यावर स्वत: शुंभासुर देवीवर धावून गेला. तो प्राणपणाने देवीशी लढू लागला. या वेळेस त्या दोघांत द्वंद्व युद्ध झाले. देवीने त्याचे धनुष्य मोडले,शक्ती हीनवीर्य केली, ढालतलवारीची वाट लावली. तरी दैत्येश्वर हटला नाही. मग देवीने त्याचा रथ तोडला.रथाचे घोडे व सारथी मारला. दैत्य देवीला घेऊन आकाशात उडाला. देवीने त्याला उचलून गरागर फिरविले व दाणदिशी भूमीवर आपटले आणि शुळाने त्याची छाती विंचून त्याची प्राणज्योत शांत केली.

याप्रमाणे शुंभनिशुंभाचा देवीने काटा काढला. सर्व विश्व आनंदले. हर्षविभोर झाले. देवांनी देवीवर पुष्पवृष्टी केली. गंधर्व गाऊ लागले. अप्सरा नाचू लागल्या, जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला.

सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमो:स्तुते ।।

देवांनी देवीची स्तुती केली. देवी प्रसन्न झाली तिने देवांना सांगितले की, **अशा प्रकारे जेव्हा जेव्हा दानव उपद्रव करतील तेव्हा तेव्हा मी अवतार घेऊन त्यांचा संहार करीन !**

● ● ●

# विवेक

## गणेश पूजा १९८७, पुणे



**कोठेही आपण पहावे जेथे युद्ध होते त्याला खतम करण्याचे, थांबवण्याचे काम जे आहे ते श्रीगणेशांच गण जाऊन करतात.**

निराकारात जे ब्रह्म आहे, तेच साकारात साक्षात श्रीगणेश आहेत. आतापर्यंत त्यांच्या गहनतेवर फार कमी विचार केला गेला आणि त्यांच्यावर जे काही सांगितले गेले, ते सर्वांनी मान्य केले. परंतु यांचे विवरण, विश्लेषण झाले नव्हते. त्याचे कारण हे आहे की, त्यावेळी आपल्यासारखे सहजयोगी नव्हते., जे चैतन्याने काठोकाठ भरलेले आहेत. जे चैतन्याला जाणत आहेत आणि ज्यांची विवेक शक्ती सर्वसामान्य लोकांपेक्षा फार उच्च आहे. विवेकाचा (सुझ और बुझ =सुझ म्हणजे कल्पना, पाहण्याची शक्ती, दृष्टी, आकलन बुझ म्हणजे ज्ञान, आकलन शक्ती) अर्थ कधी कधी लोक असा समजतात की जे तर्क आणि बुद्धीने समजले जाते हे जे संस्काराने आपल्या आत अंकीत होते, तोच सर्व काही विवेक (सुझबुझ) (प्रेम) असतो. अशी गोष्ट नाही. विवेक (सुझबुझ) जो आत्म्याच्या प्रेरणेने, आत्म्याच्या ज्ञानाने मनुष्यामध्ये एक अद्वितीय असा नवा 'आयाम' बनवते. त्याला विवेक (प्रेम)(सुझ-बुझ)म्हटले जाते. हा विवेक (सुझ -बुझ)(प्रेम)देणारा, लोक म्हणतात, श्रीगणेश आहे. तर ते कसे? हा विवेक (सुझ-बुझ)आम्हाला श्रीगणेश कशा प्रकारे देतात हे सहजयोगी अत्यंत सरळपणे सांगू शकतात कारण ज्यावेळी आपण '' 'पार' होऊन जातो., आपल्या आतून चैतन्याच्या लहरी वाहण्यास सुरुवात होते, तेव्हा आपण केवळ एक मात्र सत्यालाच जाणता, ॲब्स्ल्यूट (शुद्ध,पूर्ण) ला जाणता ही श्रीगणेशांची जादू आहे.

**श्रीगणेशच चैतन्यमय होऊन आपल्या आतून वाहतात आणि तेच साकार होऊन या चैतन्याला वाहू देतात.** ज्यावेळी आपण कोणत्याही वस्तु, प्राणिमात्र किंवा मनुष्याच्या चैतन्याला जाणू इच्छिता तेव्हा आपण जो त्याकडे हात पुढे करतो, तत्क्षणीच आपण जाणू शकता की, या वस्तुमध्ये काय दोष आहे, काय गुण आहे किंवा ही वस्तू स्वयंभू आहे किंवा नाही, याचे पूर्ण ज्ञान आपल्याला होऊ शकते, जर आपली ती स्थिती झाली तर या ज्ञानाला देणारे, या विवेकाला (सुझ-बुझ) देणारे श्रीगणेश आहेत कारण तेच चैतन्य बनून आमच्या आतून वाहतात आणि जेव्हा ते चैतन्य बनून आमच्या आतून वाहतात तेव्हा त्यांचे जे काही जाणायचे आहे, ते आम्ही सुद्धा जाणू शकतो. ते आमच्याच नसानसातून जाणले जाऊ शकते. आपण सुद्धा ओळखू शकतो की ही चैतन्य द्वारा ज्ञान होणाऱ्या ज्या काही गोष्टी आहेत, त्या बिलकुल 'सत्य' आहेत ॲबसल्युट आहेत. त्यात द्वैत नाही. त्यात काही संशोधन करण्याची गोष्ट नाही. त्यात कसली मोठी समजदारी ठेवून आपापसात त्यात वार्तालाप (चर्चा) करून कसल्याशा समझोत्यावर (निर्णयावर) पोहचण्याची (ही) गोष्ट नाही. जे आहे ते 'हेच' आहे आणि याच्याशिवाय काही (अन्य) नाही

जेव्हा हे श्रीगणेश आमच्या आत जागृत होतात तेव्हाच आमच्या आतून ही शक्ती वाहण्यास सुरुवात होते.आता आपण म्हणतो की, माँ कुंडलिनी तर त्यांची माँ

(आई)आहे आणि श्रीगणेश खाली बसलेले आहेत तर हे कशा प्रकारे घटीत होते?

सात चक्रांतून श्रीगणेश चैतन्य वाहून आपले अस्तित्व दाखवतात की आम्ही आहोत. आता प्रत्येक ठिकाणी जेथे जेथे श्रीगणेश आहेत जसे आपले येथे ऐकले असेल की, तऱ्हेतऱ्हेचे श्रीगणेश आहेत. कुणाचे नाव आहे उंबऱ्या गणपती, कुणाचे नाव आणखी काही गणपती आहे. कामाच्या अनुसार, त्याच्या कर्माच्या अनुसार, कार्याच्या अनुसार त्याचे गणपती आहेत. याप्रमाणे प्रत्येक चक्रामध्ये जे श्रीगणेश बसले आहेत, ते श्री गणेश त्या त्या स्थानाच्या त्या त्या चक्राच्या अनुसार कार्यान्वित होतात. जसे की समजून घ्या. नाभी चक्रात श्रीगणेशाचे स्थान काय आहे, तर नाभी चक्रात श्रीगणेश शेषाच्या (नागाच्या) तोंडातून वाहत असतात. 'शेषनाग' जो की आमच्या श्रीविष्णूची शय्या (निद्रास्थान)आहे. त्यांच्या आतून ते (श्रीगणेश) त्यांच्या फुत्काराच्या बरोबर वाहतात आणि त्यावेळी त्यांचा फुत्कार सुरू होतो चैतन्याचा तर आपण पाहताच की आपल्या पोटाच्या भागात एक प्रकारचे स्पंदन जसे आपल्याला जाणवते त्यालाच लोक 'परावाणी' म्हणतात. या परावाणीला पुढे चालल्यावर (पुढे गेल्यावर) दुसऱ्या वाणींची नावे आहेत. परंतु 'परा' वाणी जे स्पंदन आहे. तेच श्रीगणेशांची कृपा आहे. म्हणून आपल्या सहजयोगासाठी श्रीगणेश पुष्कळ महत्त्वपूर्ण गोष्ट आहेत. श्रीगणेशांच्या सांगण्याशिवाय त्यांच्या परवानगीशिवाय कुंडलिनी उठणार नाही. या मामल्यात कुंडलिनी आपल्या मुलाचे म्हणणे ऐकते. असे तर आईचे म्हणणे मुलगा प्रत्येक बाबतीत ऐकतोच आणि आपण जाणताच की श्री गणेश तर पूर्ण तऱ्हेने आपल्या आईला समर्पित आहेत. ते तर आपल्या वडिलांना नाही जाणत. परंतु ही जी कुंडलिनी आहे, ती श्रीगणेशांचे म्हणणे ऐकते.

ज्या वेळात तिचे उत्थापन होते (त्यावेळी) कारण मनुष्याच्या बाबतीत जे ज्ञान आहे ते सांगतात की हा मनुष्य जागृतीसाठी योग्य नाहीये. यात ते भोळेपण, साधेपण (सरळ वागणूक) नाही. त्याच्यात ते प्रेम नाही. याने पुष्कळ दुष्ट कामे केली आहेत. आणि त्याची कुंडलिनी जागृत करणे ठीक नाही. तर कुंडलिनी माँ तेथेच बसून राहते आणि जर कोणत्याही प्रकारे बिचारीला फार प्रेम उंचबळून आले आणि ती वर चढली वरपर्यंत आली सुद्धा. तरी देखील त्याला घसटून खाली, परत कुंडलिनी धाडकन खाली पडली। तर श्रीगणेशांचे कार्य अत्यंत अचूक आणि अत्यंत महत्त्वपूर्ण आहे कारण ते एकमेव सत्यालाच जाणतात. ते असत्याचे चालू देत नाहीत. त्यासाठी त्यांच्या हातात एक परशू (शस्त्र) देखील आहे.

आता जे लोक श्रीगणेशतत्वाला जाणू इच्छित आहेत आणि (त्यात)उतरु इच्छित आहेत आणि श्रीगणेश तत्वामध्ये सामावून (एकरुप ) जाताहेत. (म्हणजे) फक्त श्रीगणेशांचीच भूमिका या मूलाधार चक्रावर आहे तिच्यातच ते एकरुप होतात.

जणू काही असे लोक की जे स्वत:ला मोठे सन्यासी, ब्रह्मचारी इत्यादी बनवून राहतात. त्यांच्या आतमध्ये देखील एक अशी असंतुलन असणारी दशा स्थिती येते की जेथे श्रीगणेश एकाच प्रकारचे होतात. एकांगी श्रीगणेशांची, आपल्याला माहीत आहे की सात स्वरुपे आहेत आणि ते सात स्वरुपात न उतरण्याच्या कारणामुळे एकाच स्वरुपात बसून राहतात एकच गणपती जर पुण्यामध्ये राहिला तर येथे काही आल्हाद आणि उल्हासच येणार नाही. लोकांना मजा देखील येणार नाही. म्हणजे त्यांचे जे सात प्रकार आहेत, त्या सात गणपतींना आपण जाणले पाहिजे आणि जोपर्यंत ते आपल्या आत जागृत होणार नाहीत (तोपर्यंत) आपण एक अजब, विचित्र प्रकारची आपल्या स्वत: करीता आणि दुसऱ्याकरीता समस्या बनून राहील. आता जे लोक फार गणपतीची सेवा करत आले आहेत आणि जे गणपतीलाच मानून राहिले आहेत आणि ब्रह्मचर्यामध्ये लीन आहेत आणि विवाह देखील केला नाही आणि कोणत्याही स्त्रीकडे पाहिले देखील नाही इत्यादी प्रकारातून ते सरळ आपल्या पिंगला नाडीवर चालल्याने श्रीगणेश एक प्रकारे दूर जातात. तेथे कार्तिकेय यांचे रूप येते. पिंगला नाडीवर गेल्याने असे लोक फार क्रोधी होतात. श्रीगणेश हे सौम्य स्वरूप आहेत. अत्यंत सौम्य आहेत. त्यांच्या सौम्यातच त्यांचा मूलधर्म आहे. कोणतीही वस्तू जास्त भडकते त्यावेळी तिला शांत करण्यासाठी श्रीगणेशांचा उपयोग करतात. कोणतीही वस्तू जास्त गरम झाली

तर तेथे श्रीगणेश ठेवून द्यावेत ती वस्तू लगेच थंड होऊन जाईल.कुणा व्यक्तीची तब्येत जास्त बिघडली तर त्यांना श्रीगणेशांच्या हवाली करावे. त्या व्यक्तीचा ताप लगेच कमी होईल.कोणी जर फार क्रोध करीत असेल तर श्री गणेश दाखवावा ती व्यक्ती थंड होऊन जाईल. ज्यांच्यात श्रीगणेशांचे गुण आहेत ते अत्यंत थंड डोक्याने काम करतात.

अशा लोकांचे व्यवहार गणांप्रमाणे असतात आणि आता हे ज्यांनी विचार करून बनवले किंवा ज्यांच्या डोक्यात ही गोष्ट आली असेल, असू शकते की तो रिअलाईज सोल (आत्मसाक्षात्कारी) असावा. त्यांच्यात फारच खुबीची गोष्ट ही आहे की ते नेहमी सत्कर्मात गर्क असतात. आणि शांत चित्त आहेत, जर श्रीगणेशांचे गण शांत चित्त नाहीत तर जगाचा विध्वंस होऊन जाईल. **कोठेही आपण पहावे जेथे युद्ध होते त्याला खतम करण्याचे,थांबवण्याचे काम जे आहे ते श्रीगणेशांचे गण जाऊन करतात.** आता मी आपल्याशी बोलत आहे, याचा अर्थ हा नाही की आपण पूर्णप्रकारे त्याला बोलण्याला मानावेच. परंतु आहे ही अशी गोष्ट. आता आपण जर गण स्वरूप आहत,तर आपल्यामध्ये शांत चित्त फार जरुरीचे आहे. आपल्यात क्रोध आहे तर आपण श्रीगणेशांच्या विरोधात जात आहात. फक्त श्रीगणेशांना अधिकार आहे की आपले शस्त्र चालवण्याचा कारण ते स्वत: ज्ञानाची मूर्ती आहेत. आणि या स्वं-विवेकाचा (सुझ-बुझ)स्त्रोत आहे. परंतु मानवाला अधिकार नाही की त्याने आपल्या क्रोधाचे बळी व्हावे. क्रोधासाठी नेहमी माणूस जेव्हा क्रोध करतो, तेव्हा तो आपल्यासाठी सुद्धा वाईट असतो कारण त्याचे नुकसान होते. नंतर तो पश्चाताप सुद्धा करू शकतो. जर त्याच्यात इतका संवेदनशील 'मानव' असला तर. परंतु संवेदनशील नसला तर, तो हे म्हणतो की मी यासाठी नाराज झालो,जसे श्रीगणेश म्हणतात की मी यासाठी शुद्ध केला की लोक आईच्या विरुद्ध बोलत होते. हे झाले नी ते झाले. आणि मी आईच्या सेवेत आहे. आईचे मी रक्षण करतो, मी आईवर प्रेम करतो. सर्वात मोठे रक्षण आईचे आहे. 'आपसी प्रेम' (आपापसातील प्रेम) आहे इतकी त्यांच्यात आपापसात ओळख आहे की ज्यावेळी बारा वर्षाचा मुलगा होतो, तेव्हा आपल्या या मध्य हृदयाचे जे चक्र आहे अनाहत, बारा वर्षापर्यंत तेथील अँन्टीबॉडीज (उपद्रव नाशक संरक्षक) जी हृदय चक्राच्या चारी बाजूला फिरत असतात.जर बाहेरच्या शक्तीचे आक्रमण झाले तर ह्या अँटीबॉडिज आहेत ते चारी बाजूला आपल्या शरीरात पसरून ,जर कोणी सुद्धा आपल्या शरीराला आघात केला किंवा आपल्या शरीरावर कोणतीही परकिय सत्ता आपल्यावर हुकमत वाढवत असेल अथवा जे काही परमात्म्याविरूद्ध आहे, त्याचा ती सामना करते.

गण सर्व एकाच कार्यासाठी नियुक्त झाले आहेत,जर गण आपापसात लढत राहिले तर अशा गणांचा समुच्चय ज्या शरीरात असेल तर त्याचे काय हाल होतील? जे गण सर्व एकाच कार्यासाठी नियुक्त झाले आहेत. समजा, की आम्ही लढत आहोत इंग्रजांबरोबर आणि तर इंग्रज म्हणतील चांगले झाले. मग त्यांनी हेच केले की, आपसात लढा मरा आणि तेच आम्ही आज सुद्धा करत आहोत. आपल्या देशात पूर्णवेळ हेच चालत आहे की याला मारा, त्याला मारा, त्यांना मारा. यांना मारा- ह्या सर्व गोष्टी येतात कोठून? येतात त्याच क्रोधातून आणि हाच क्रोध येतो आपापसातल्या संघर्षातून आपापसातला संघर्ष जेव्हा होतो तेव्हा क्रोध येतो.याचा आपण विचार करत नाही की आम्ही सर्व जण एकाच कार्यासाठी आहोत.

आता अनेक प्रकार आहेत की मुंबईवाले असे आहेत तर दिल्लीवाले असे आहेत; तर फलाने असे आहेत ती ठिकाणे असे आहेत हे सर्व ऐकून मला आश्चर्य वाटते की जर सर्वांची आई जर एकच आहे तर कोण दिल्लीवाले आणि कोण मुंबईवाले? आणि या प्रकारची जोपर्यंत एकात्मता आपल्या आत येणार नाही तोपर्यंत आपण लोक सहजयोगी नाही. ही एकात्मता येण्यासाठी प्रथम आत पाहिले पाहिजे. काय आमच्या आत कुणाबद्दल जलसी , दुसऱ्याची टर उडविण्याची आवड , आपल्या आत अहंकार नाही ना हे आपण प्रत्येकाने जाणले पाहिजे.

● ● ●

## निरागसता

### गणेश पूजा, १९९९
### मास्को



**सहजयोगात पुष्कळ लोक मी अबोधित झालेले पाहिले आहेत. श्री गणेश, जे तुमच्या डोक्याच्या मागच्या बाजूला महागणेश म्हणून आहेत, तुमच्या डोक्यावर कार्य करीत असतात, डोळ्यातील पाप व वखवख जणू संपवून टाकतात.**

श्री गणेश मूलाधार चक्रामध्ये आहेत. मूलाधारामध्ये नव्हे. मूलाधारावर कुंडलिनी आहे, जी श्रीगणेशांची आई आहे. तिला आपण गौरीमाता म्हणून ओळखतो. आता आपण मानवी जाणिवेच्या अशा स्तरावर आलो आहोत की जी एक नवीन चौथी आयाम आहे. श्रीगणेशांच्या कृपेशिवाय हे शक्य नव्हते. जे आपल्यामधील अबोधिततेच प्रतीक आहेत. ही अबोधितता अनंत असल्यामुळे तिचा नाश होऊच शकत नाही. एरवी आपणच केलेल्या चुकांमुळे ती कधी कधी झाकाळून जाते. पण एकदा तुम्हाला आत्मसाक्षात्कार झाला की ती पुन्हा प्रस्थापित होते आणि तिचा आविष्कार होत राहतो. मग तुम्ही अबोधित बनून जाता, तुमच चित्तच अबोधित बनते.

जोपर्यंत तुम्ही प्रकाशित होत नाहीत तोपर्यंत कुठलाही धर्म समजणे अशक्य आहे. ख्रिस्तांचा मोहम्मदसाहेबांचा किंवा ज्यूंचा. ही एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली नाही.कारण ते स्वत: उच्च कोटीतले होते. जेव्हा मोझेसने दहा आज्ञा सांगितल्या तेव्हा ज्यू लोकांचा समाज अगदी अवनत झाल्याचे त्यांनी पाहिले. जसा तो आता पण आहे. नितीमत्ता हा शब्दच त्यांना माहीत नाही. सहजमधून मनुष्यप्राणी निरागस बनू शकतो. ज्यू लोकांच्या शरीयतमध्ये असे सांगितले आहे की, जर एखादा चोर ठरला तर त्याचे हात कापा, शरीराचे तुकडे करा. श्रीगणेश हे आपल्यामधील शुद्ध आत्मा आहेत आणि त्यांनी या पृथ्वीतलावर येशू ख्रिस्त हा अवतार घेतला. पण त्यांचासुद्धा अनेक प्रकारे छळ केला गेला आणि एक वेगळाच धर्म निर्माण केला गेला. हेच इतरांच्या बाबतीत झाले. खरं म्हणजे कुठल्याही धर्मग्रंथामध्ये दुसऱ्या धर्माच्या विरुद्ध वेगळे असे काहीही सांगितले नाही. उदा. मोहम्मदसाहेबांनी सुद्धा मोझेस, ख्रिस्तांची माता यांचे बद्दल लिहीले आहे म्हणजेच त्यांनी कुठलाही नवा धर्म स्थापन केला नाही. ते सगळ्या धर्माबद्दल ते एकरूप आहेत. असच सांगत होते. पण आता आपल्यामध्येच असे काही लोक आहेत की ज्यांना धर्म म्हणजे परमात्म्याच्या एकाच वृक्षावर आलेली फळे आहेत ही गोष्ट पटतच नाही. त्यामुळे ते दुसऱ्या धर्माच्या लोकांशीच नव्हे तर आपल्या बांधवांशी पण भांडत आहेत.परमेश्वराच्या नावाखाली त्यांनी किती तरी लोकांना ठार केले आहे.

अबोधिता हे एक प्रेमाचे उगमस्थान आहे. लहान मुलांना सुंदर नाचगाणी करताना पाहून जसे तुम्हाला त्यांच्याबद्दल प्रेम वाटू लागते तसे एखादे लहान गोड बालक तुमच्याकडे पाहून हसू लागले की तुम्हाला त्याच्याबद्दल अपार प्रेम वाटते। तुम्ही तुमच्यामधील या अबोधिततेचा आदर करत नसाल तर तुम्ही कधीच दुसऱ्या कुणावर प्रेम करू शकणार नाही.

**अंत:करणात प्रेम निर्माण झाल्याशिवाय तुम्ही सत्य जाणू शकत नाही.** अडचण एवढीच असते की आपण कधी कधी निरागस मानसावर प्रेम करायला बिचकतो किंवा त्या बाबतीत साशंक होतो. असे निष्पाप लोक कधीही त्रासदायक नसतात. मुलांना आई-वडिलांनी मारलेलं मला आवडत नाही. मुले निरागस असल्यामुळे काही तरी चाळे करतात म्हणून त्यांना समजून घेऊन आपण त्यांच्याशी प्रेमाने वागायला हवे.

आजकाल रशियात पण जन्मत: साक्षात्कारी असलेली खूप मुले आहेत. कारण आता तुम्ही सर्वजण प्रकाशित आहात आणि बरेच संत महात्मे तुमच्या पोटी जन्माला येण्यास उत्सुक आहेत. पण आधी तुम्ही स्वत: अबोधित बनायला हवे. ज्या देशात मुलांना प्रेम व आदर मिळत नसतो तिथे जन्म घ्यायला ते तयार नसतात. त्या देशातील जन्मसंख्या कमीच असते. पण भारतासारख्या देशामध्ये जिथे मुलांबद्दल खूप प्रेमाची भावना असते. तिथेच त्यांना जरी तो देश गरीबांचा असला तरी, जन्म हवा असतो. मुलांना पैसा आणि त्याबरोबर भौतिक गोष्टी माहीतच नसतात. ती फक्त प्रेम जाणू शकतात. तुमच्या हृदयात खऱ्या प्रेमाची भावना नसेल तर तुमच्यामध्ये श्रीगणेश जागृत होणार नाहीत.

मुलांबद्दल आईला प्रेम वाटत असेल तर त्यांच्याकरता कराव्या लागणाऱ्या प्रत्येक गोष्टीमधून तिला आनंदच मिळतो. असं प्रेम ज्या आईला वाटत नसेल तिला हे फार करावं लागतं असं वाटत. तुम्ही तिला त्याबद्दल विचारले तर ती म्हणेल, मला हे धुवायचं आहे ते स्वच्छ करायचं आहे, मुलांचं बघायचं आहे. वगैरे वगैरे. पण आत्म्याच्या प्रकाशात असलेली माता हे सर्व काम आवडीने करत असते आणि त्याचा तिला आनंद पण मिळतो. तिला स्वत:च्या मुलांबद्दल आदर असतो आणि त्यामुळे मुलांकडूनही तसाच आदर ती प्राप्त करू शकते. मुलांशी कठोर शिस्तीनेच वागले पाहिजे, असं मुळीच नाही. लहान मुले फार हळूवार मनाची पण तितकीच चाणाक्ष असतात. आता हजारात एखादा मुलगा तसा चांगला नसेलही. पण जसजशी ती मोठी होतात तसतशी मोठ्यांचे विशेषत; आई-वडिलांचं पाहून आणि आजूबाजूच्या वाईट गोष्टी पाहून ती बिघडू लागतात आणि मग त्रासदायक होतात. याचा अर्थ असा नाही की तुम्ही मुलांवर लक्ष ठेवून त्यांना शिस्त लावायला नको किंवा त्यांना शिकवायला नको. अगदी सोपा उपाय म्हणजे तुम्ही स्वत:च अबोधित आणि धार्मिक व्हा.

**श्रीगणेश हे नितीमत्तेचे अधिष्ठान आहेत. ज्या समाजामध्ये नितीमत्तेला काहीच महत्त्व नाही तो समाज रसातळाला जातो. इतर आर्थिक, राजकिय व सांपत्तिक बाबतीत प्रगती झाली असली तर ते लोक आतून कळाहीन होतात.** आता अमेरिकेकडे बघा. ते लोक सर्व बाजूंनी सधन आहेत. पण तिथे आज काय चालले आहे? बारा वर्षाची लहान पोरही खून करतात आणि अमली पदार्थ विकतात. आणखी काही दुसऱ्या पाश्चात्य देशात आई-वडीलंच आपल्या मुलांना ठार मारतात. जे देश प्रगत व सधन आहेत तिथे तितकी अनितीमत्ता हे वैशिष्ट्य आहे. ते लोक दंगे-धोपे करणारे आणि उद्दाम व आढ्यताखोर बनले आहेत. अबोधितेमध्ये अहंकार मुळापासून गळून पडतो आणि मग तुम्ही मुलांशी बोलता, त्यांच्याशी गप्पा मारता आणि त्यांच्या चाणाक्षतेने त्यांच्या बोलण्याने तुम्ही आश्चर्यचकित होता. ती मुले फार प्रेमळ व गोड असतात. श्रीगणेशांना एकदा त्यांच्या वडिलांनी सांगितले की जो कोणी पृथ्वीप्रदक्षिणा करेल त्याला बक्षीस मिळेल. श्रीगणेश मनात म्हणाले हा कार्तिकेय नक्कीच पैज जिंकणार कारण तो मोरावर बसणार आणि मोर हा पक्षी आहे म्हणून उडत जाणार. माझ्याजवळ काय आहे? मी या लहानशा उंदरावर बसून जाणार. पण गणेश हे साक्षात सुज्ञपणा आहेत आणि त्या सुज्ञतेतून त्यांनी विचार केला , माझी आई ही पृथ्वीमातेपेक्षा मोठी आहे. मग त्या आपल्या आईभोवती तीन फेऱ्या मारल्या आणि बक्षीस मिळवले.

**जो अबोधित असतो तो फार नम्र असतो. त्याला काहीच दिखाऊपणा आवडत नाही. त्याला दिखाऊपणा कसा करायचा ते माहीतच नसते.** श्रीगणेशांकडे पहा. ते लहानशा उंदरावर बसून संचार करतात. पण ज्या लोकांना देखावा करायचा असतो ते न परवडणाऱ्या गाड्या कर्ज काढून विकत घेतात आणि आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करतात आणि त्याचाच फायदा उठवत लोकही जगत असतात. पाश्चिमात्य देशात कपडे डिझाइन करणारे लोक असतात. आणि कपड्यावर आपल्या नावाची लेबले लावतात अशा कपड्यांना फार पैसे मोजावे लागतात आणि आपल्या कोटावरचे हे लेबल मिरवण्याचा लोकांना सोस असतो. अशा तऱ्हेने धंदेवाईक लोक दिखाऊपणाच्या लोकांच्या प्रवृत्तीचा पुरेपूर फायदा उठवितात. अबोधित माणसाला आपल्या शरिराची, फॅशनची शरीराचे लाड करण्याची वगैरे कसलीच पर्वा नसते.

**श्रीगणेश हे धर्माचे अधिष्ठान आहेत. मुलांकडे बघा ती कधी खोटे बोलत नाहीत.** एवढंच नाही तर कधी कधी आपलीच कुचंबणा होईल असे बोलतात. एकदा एकाच्या आईने वडिलांना सांगितले की संध्याकाळी येणारा पाहुणा राक्षसासारखा

जेवतो. मुलाने ते ऐकले आणि मग तो पाहुणा आल्यावर त्याच्याकडे तो जेवताना पहात राहिला. मग म्हणाला, आई हा तर राक्षसासारखा मुळीच जेवत नाही. मग तू तसे का म्हणालीस? अस खोटे बोलू नको. आईची खूप कुचंबणा झाली. अबोधित माणूस त्याच्या निरागसतेतून इतरांची त्याच्याबद्दल होणारी टीका आणि टोमणे कमी करून टाकतो. कारण अनितीमान माणसासारखी त्याची दृष्टीच नसते. एकदा माझ्या नातीने एक पोहण्याचा वेष केलेली स्त्री बघितली. सांगण्यासारखी गोष्टं म्हणजे ती त्या स्त्रीला म्हणाली, तू दुसरे चांगले कपडे घालून ये नाहीतर माझी आजी तुला रागवेल. तर अशी लहान मुल पाहिलीत, ती कशी वागतात, बोलतात आणि किती निरागस– निष्पाप असतात याचा अनुभव घेतलात की तुम्हाला फार आनंद होईल. ही अबोधिता प्रेम आणि आनंदाचा स्त्रोत आहे. तुमच्याजवळ असे प्रेम नसेल किंवा हा आनंद तुम्ही मिळवू शकला नाहीत तर मग दुसऱ्यांचे दोष काढणे, दुसऱ्यांवर टीका करणे अशा फालतू गोष्टींमध्येच तुम्ही तुमची शक्ती आणि वेळ गमावून बसता. परवाच मी सुंदर संगीत ऐकत होते, डोळे मिटून मी त्या मधुर सुरांमध्ये रमून गेले होते. अगदी रंगून ऐकत होते. पण आजूबाजूच्या काही बायका त्या गाणाऱ्याचा पेहराव, त्याचे हातवारे ह्याच्याबद्दल बोलत होत्या. त्यांचे सारे लक्ष या वरवरच्या गोष्टीकडे होते आणि मूळ अस्सल गोष्टीची त्यांना जाणीवच नव्हती. अबोधिता तुम्हाला मूलाकडे, अस्सल भावाकडे घेऊन जाते आणि प्रेम हे मूळच आहे. श्री गणेशांचा हा गुण आपण लक्षात घ्यायला पाहिजे आणि तो स्वत:मध्ये आणला पाहिजे.

श्री गणेशांची अबोधिता आपल्यामध्ये सुप्त आहे पण तिचा आविष्कार व्हायला हवा. मी एकदा एका सहजयोग्याच्या घरी गेले होते. तिथे पंचवीस-एक लोक जमले होते. मिटींग झाल्यावर ते सर्व लोक जाईपर्यंत मी थांबले. तो माणूस हे सर्व लोक जाईपर्यंत स्वयंपाकघरातच होता. परत आल्यावर तो म्हणाला, श्री माताजी हे काय केलत? हे सर्व लोक कुठे निघून गेले? मी त्यांच्याकरता स्वयंपाक तयार केला आहे . एवढे बोलून त्याच्य डोळ्यात पाणी आले. मी त्याच्या आदरातिथ्याने व त्याच्या कनवाळू वृत्तीने अगदी भारावून गेले. अस आदरतिथ्य जेव्हा आतून होते तेव्हा त्याची तुम्हाला जाणीव होत नाही. तुम्ही फक्त त्याच्यातून मिळणारा प्रसन्नतेचा आनंद घेता आणि त्याच्या प्रतिक्रियेची पर्वा करत नाही.

आपल्या शास्त्र ग्रंथांमध्ये अशा माणसांचा उल्लेख आहे. उदा. श्रीराम, ते रानात हिंडत होते आणि त्यांना शबरी नावाची दात पडलेली म्हातारी वनवासी स्त्री भेटली. ती रामापुढे आली आणि त्यांना बोरे खायला सांगून निष्पापपणे म्हणाली की, मी प्रत्येक बोर खाऊन बघितले आहे, अंबट बोरे फेकून दिली आणि तुमच्यासाठी ही गोड बोरंच फक्त ठेवली आहेत. भारतात दुसऱ्याने उष्टं केलेलं कोणी खात नाही. श्रीरामांनी ती उष्टी बोरं आनंदाने खाल्ली. लक्ष्मणाला मात्र त्याचा राग आला आणि मग शबरी आपल्या हाताने रामाच्या तोंडात बोर द्यायला लागल्यावर तर त्याचा राग अनावर झाला. श्रीराम म्हणाले, काय गोड बोरं आहेत इतकी मधुर बोरं मी आज पर्यंत कधीच खाल्ली नव्हती. सीतेने पण ती बोरे खाल्ली आणि तिला पण आवडली. मग लक्ष्मणाने पण मागितली शबरीजवळ आणखी बोरे होती आणि तिने ती लक्ष्मणाला दिली. त्याला पण ती फार आवडली.

कधी कधी आपण मुलांमध्ये जास्त गुंतून घ्यायची चूक करतो. त्यांना आपण जास्त महत्त्व देतो. अबोधिता ही वाहत्या झऱ्यासारखी आहे. त्याला थांबवायचा प्रयत्न केला तर मुले बिघडतात. त्यांचा आदर ठेवला पाहिजे पण त्याचबरोबर त्यांना काहीतरी वेगळपणं जाणवतं. पहिली गोष्ट म्हणजे ती कंटाळवाणी होत नसतात. तुम्ही अबोधित असाल तर सदैव ताजेतवाने असता. तुम्हाला सगळीकडे सौंदर्यच दिसते. एकटे असलात तरी तुम्ही स्वत:शीच आनंदी असता. मोठी माणसेच फक्त कंटाळलेली होतात. विमानतळावर विमानाला उशीर असला तर मोठी माणसेच त्रासून जातात.पण मुलं मात्र तिथे कशा ना कशात कठडा, पायऱ्या वगैरे यात रमलेली असतात. उठसूठ कुठल्याही गोष्टीबद्दल काटेकोरपणे विचार करण्यात आपल आयुष्य आपणच फुकट घालवायला ती तयार नसतात. विमानतळावर मी नेहमी पाहते की, मोठी माणसे फार अस्वस्थ व बैचेन होतात आणि त्यांच्या उलट लहान मुले इकडे-तिकडे बागडत असतात व बरोबरच्या परक्या मुलांबरोबरही रमून जाऊ शकतात. पुष्कळ आई-वडील जात – पात पाळण्यात अती कठोर असतात. तर त्यांचीच मुले दुसऱ्याबरोबर चटकन मिसळून जातात. अबोधित माणूस हा असा असतो. तो कोणाशीही -कुठल्याही जातीच्या वर्णाच्या चेहरामोहऱ्याशी जमवून घेतो. या वरवरच्या गोष्टी त्यांच्या आड

येत नाहीत. मुलांचे पण या वरवरच्या गोष्टीकडे लक्ष जात नाही. ती फक्त हृदय व त्यातील प्रेम जाणतात. प्रेमळ माणूस मग कुठल्या का जातीचा असेना दिसला की ती त्यांच्याकडे धाव घेणारच.

**अबोधिततेत अहंकार पूर्ण गळून जातो. अबोधित माणूस आक्रमक वृत्तीचा नसतो, कदाचित असलीच तर ती प्रेमापोटीच असते.** उदा. मुलगा म्हणेल, या मुलाला माझे कपडे का नाही देत? तर तुम्ही म्हणाल अरे वा, मी या कपड्याकरता इतके पैसे मोजलेत आणि तू म्हणतोस ते याला देऊन टाक? मुलगा त्यावर म्हणेल, ठीक आहे, मला दुसरे परत दुकानातून आणा पण हे कपडे त्या मुलालाच देणार. निरागस मुलांजवळ असा अप्पलपोटेपणा नसतो. शिवाय मुले आपापल्या वस्तू एकमेकांबरोबर देवाण-घेवाण करायला तयार असतात. पण जर त्यांना मुळातच अशी शिकवण मिळाली की अमुक-अमुक वस्तू आपली आहे आणि ती दुसऱ्या कोणाला द्यायची नाही तर ती मुले मग स्वार्थी आपमतलबी बनतात.जीवनात आनंद मिळवण्याचा सर्वात चांगला मार्ग म्हणजे मुलांच्या संगतीत राहणे. मुलांसारखे असणे आणि त्यांच्याबरोबर आनंद लुटणे त्यातून आपली अबोधितता वृध्दिंगत होते. **सहजयोगात पुष्कळ लोक मी अबोधित झालेले पाहिले आहेत. श्री गणेश, जे तुमच्या डोक्याच्या मागच्या बाजूला महागणेश म्हणून आहेत, तुमच्या डोक्यावर कार्य करीत असतात, डोळ्यातील पाप व वखवख जणू संपवून टाकतात.** तुमचे चित्त अबोधित झाल्यामुळे डोळे काढून टाकायचे किंवा हात कापायचे आता बंद,कारण तुम्ही खरोखर छान झालेले असता. श्रीगणेशांप्रमाणे तुम्ही पण निष्पाप संत म्हणून जन्माला आला आहात. त्या अबोधिततेचा आदर करायला शिका. त्यातून तुम्ही चिरतरुण आणि समाधानी व्हाल.

महाराष्ट्रात आठ स्वयंभू गणेशांची स्थाने आहेत. मी महाराष्ट्रीयन लोक अबोधित असल्याचे पाहिले आहे. भारत हा फार प्राचीन देश आहे आणि या प्रांतात श्रीगणेशांना मानणारे खूप लोक आहेत. म्हणून अबोधिता त्यांच्यामध्ये आहे. इथे श्रीगणेशांची स्थापना करून दहा दिवसांचा उत्सव करतात. ही मूर्ती शाडूच्या मातीची बनवितात आणि दहा दिवसांनंतर समुद्रात किंवा नदीत तिचे विसर्जन करतात. पण आता ही कोका-कोला संस्कृती भारतात पण आली आहे. श्री गणेशांसमोर घाणेरडी अश्लील गाणी म्हटली जातात. तसेच दारू पितात ती पण त्यांच्याच समोर. हे सर्व सार्वजनिक गणेश मंडळात चालते. मी दोनदा माझ्या भाषणामधून त्यांना बजावले होते की हे करू नका एकदा का श्री गणेश रागावले की भूकंप होईल. तरीही तिसऱ्या वर्षी हे लोक गणेशांना विसर्जन करून परत आले आणि रात्रभर दारू पिऊन नाचण्यामध्ये गर्क झाले. अचानक मोठा धरणीकंप झाला आणि ते सर्वजण गाडले गेले. सहजयोगी मात्र बचावले. त्याठिकाणी सहजयोगाचे जे केंद्र होते त्याला भूकंपापासून काहीच नुकसान झाले नाही.एवढेच नव्हे तर त्यावास्तुच्या आजूबाजूच्या बऱ्याच अंतरापर्यंतच्या इमारतींना भूकंपाचा काही परिणाम झाला नाही. पण त्या वास्तूभोवती एक मोठा चर पडला होता जे लोक बाहेर पडून आपला जीव वाचवण्यासाठी या केंद्राकडे धावले ते सर्व नॉनसहजयोगी त्या खड्यात पडून मरण पावले.

**अबोधितता ही फार मोठी शक्ती आहे. जो कोणी या अबोधिततेचा अपमान करतो किव्हा तिचा नाश करण्याचा प्रयत्न करतो त्याला श्रीगणेशाकडून फार कडक शिक्षा मिळते. जे लोक हृदयापासून श्री गणेशांची पूजा करत नाहीत ते डाव्या बाजूला तरी जातील किंवा उजव्या बाजूला तरी जातील.** जे उजव्या बाजूचे होतात त्यांना बऱ्याच आजारांना तोंड द्यावे लागते. जे बहुदा शारीरिक आजार असतात जे लोक डाव्या बाजूकडे पूर्णपणे होतात त्यांना मानसिक रोगाने पछाडले जाऊन ते बरे होणारे नसतात. आपल्याकडे असे काही भयंकर विकृत लोक होते की, शारीरीक संबंधातून कुंडलिनी वर चढते असा हे प्रचार करायचे. हे तांत्रिक प्रकार झाले. हे तांत्रिक मंदिरातसुद्धा असले घाणेरडे प्रकार करायचे.यातून त्यांनी श्रीगणेशांचा फार मोठा अपमान केला आहे. त्या सर्वांचा आता नाश होत आहे म्हणून अबोधित माणसाला तुम्ही उगीच आव्हान देऊ नका, कारण त्याच्याजवळ श्रीगणेशांचे आशीर्वाद आहेत.

● ● ●

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ।।
करुनी घेयावे हे तुमते । विनुविनु असे ।।

श्री गणेश स्थापना, प्रतिष्ठान पुणे २००७



श्री गणेश पूजा, भूगांव आश्रम, पुणे २००७





श्री गणेशोत्सव, सहजआश्रम, पुणे





स्वयंभू गणेश, ऑस्ट्रेलिया





# गणपतीपूळे सेमीनार, २००७





